रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १७२
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, ७ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## ‘विकसित भारतासाठी देशातील रेल्वेचा विकास महत्त्वाचा’



**नवी दिल्ली :** सन २०१४पर्यंत देशात केवळ ३५ टक्के रेल्वेचे विद्युतीकरण झाले होते, परंतु आता देशात जवळजवळ १०० टक्के रेल्वेचे विद्युतीकरण झाले आहे. विकसित भारत निर्माण करण्याच्या संकल्पात भारतीय रेल्वेचा विकास महत्त्वाचा आहे आणि भारतात पहिली बुलेट ट्रेन धावेल तो दिवस दूर नाही, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. जम्मू काश्मीर, तेलंगणा आणि ओडिशा राज्यांमधील विविध रेल्वे प्रकल्पांच्या पायाभरणी आणि उद्घाटन समारंभात ते बोलत होते. दिल्लीतून दूरदृश्य प्रणालीद्वारे त्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. २०२५च्या सुरुवातीला भारत एक हजार किमीपेक्षा जास्त मेट्रो रेल्वे जाळ्याचा विस्तार करून विविध उपक्रमांना गती देत आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगून सबका साथ सबका विकास हा मंत्र विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यास मदत करतोय, असे म्हटले.

### अंतरंग
आपलं सरकार वेब पोर्टल सक्षम व नव्या स्वरूपात/२
कत्तलीसाठी गुरे घेऊन जाणारा टेम्पो पकडला/७
खारघरमध्ये बास्केटबॉल स्पर्धा उत्साहात/८

# एचएमपीव्ही व्हायरसमुळे घाबरू नका

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागरिकांना आवाहन



**मुंबई : प्रतिनिधी**

ह्युमन मेटान्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) हा व्हायरस नवीन नाही. यापूर्वीही हा व्हायरस आला आहे. पुन्हा एकदा या व्हायरसचा चंचूप्रवेश होताना दिसतो आहे. या संदर्भात जी नियमावली आहे ती जाहीर होईल. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने राज्यांना माहिती देण्याचे ठरवले आहे. या व्हायरसला घाबरुन जाण्याची आवश्यकता नाही. या संदर्भातील कपोलकल्पित माहितीवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

चीनमध्ये मोठ्या संख्येने मुलांमध्ये लागण झालेल्या एचएमपीव्ही विषाणूची भारतातही प्रकरणे दिसू लागली आहेत. गुजरातमधील अहमदाबाद येथील एका दोन महिन्यांच्या मुलाचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. सध्या या मुलावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.

आतापर्यंत भारतात तीन रुग्ण आढळले आहेत. गुजरातव्यतिरिक्त कर्नाटक या एकाच राज्यात दोन रुग्ण आढळले आहेत. कर्नाटकात एक तीन महिन्यांची मुलगी आणि दुसरा आठ महिन्यांच्या मुलाचा यात समावेश आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये आंतरराष्ट्रीय प्रवासाचा कोणताही इतिहास नाही. या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, एचएमपीव्ही व्हायरससंदर्भात राज्याच्या आरोग्य विभागाची बैठक झाली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाबरोबर बैठक चालू आहे.

दरम्यान, भारतातील या व्हायरससंबंधी परिस्थितीबद्दल माहिती देताना केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने निवेदन जारी केले आहे, ज्यामध्ये एचएमपीव्ही भारतासह जागतिक स्तरावर आधीपासूनच प्रसारित झाला आहे आणि विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसन आजारांची प्रकरणे नोंदवली गेली आहेत, अशी माहिती देण्यात आली आहे. या संक्रमणावर लक्ष ठेवले जात असताना भारतातही कर्नाटकमध्ये याची दोन प्रकरणे आढळून आली आहेत. या दोन्ही रुग्णांनी कुठलाही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही. म्हणजेच भारतात आढळलेल्या संक्रमणांचा चीनमधील संसर्गाच्या वाढलेल्या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असेही या निवेदनात सांगण्यात आले आहे.

एचएमपीव्ही व्हायरस सहसा फक्त लहान मुलांमध्ये आढळतो. तो प्रामुख्याने श्वसन संक्रमणास कारणीभूत ठरतो आणि खोकल्यामुळे किंवा शिंकण्याद्वारे पसरतो. संक्रमित लोकांच्या संपर्कात आल्यानेदेखील तो वेगाने पसरू शकते. त्याच्या संसर्गाचा कालावधी तीन ते पाच दिवसांचा असतो आणि हिवाळ्यामध्ये हे सर्वात सामान्य आहे. आरोग्य तज्ज्ञांनी या व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी दक्षता आणि सार्वजनिक आरोग्य मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.



# नमो चषक भव्य दिव्य स्वरूपात होणार –लोकनेते रामशेठ ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मागील वर्षी नमो चषक क्रीडा, सांस्कृतिक महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आणि त्याचप्रमाणे यंदाही नमो चषक भव्य दिव्य स्वरूपात होईल, असा विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी (दि. ६) उलवे नोड येथे व्यक्त केला.

पनवेल आणि उरण भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजनातील विविध समित्यांची बैठक झाली. त्या वेळी ते बोलत होते.

या बैठकीस पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व नमो चषकाचे मुख्य आयोजक परेश ठाकूर, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शहा, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, भार्गव ठाकूर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी जि.प. सदस्य जीवन गावंड, विश्वनाथ कोळी, हेमंत पाटील, सागर ठाकूर, प्रशिक्षक सूर्यकांत ठाकूर, विनोद नाईक, न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, शरीरसौष्ठवपटू दिनेश शेळके, माजी उपसरपंच विजय घरत, अमर म्हात्रे, स्वप्नील ठाकूर, किशोर पाटील, अभिषेक भोपी, अंकुश ठाकूर, बी.के. ठाकूर, सुधीर ठाकूर व समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. (पान २ वर..)

### यशस्वी नियोजनासाठी १७ समित्या स्थापन

नमो चषकच्या यशस्वी नियोजनासाठी विविध १७ समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांनी आपल्या जबाबदारीचा आढावा या वेळी सादर केला. उत्कृष्ट व भव्य आयोजनातून हा नमो चषक संपन्न झाला पाहिजे यासाठी आयोजन समितीतील प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्त्याने जबाबदारी यशस्वीपणे पार पाडावी, असे आवाहन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी केले. तत्पूर्वी त्यांनी येथे होणाऱ्या स्पर्धेच्या अनुषंगाने मैदानाची पाहणी केली.

## एनडी स्टुडिओच्या अद्ययावतीकरणासह व्यवसाय वृद्धीसाठी सल्लागार नियुक्त करावा

■ सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची सूचना



**मुंबई : प्रतिनिधी**

एनडी स्टुडिओचे अद्ययावतीकरण करून या ठिकाणचा व्यवसाय वाढवण्याच्या दृष्टीने त्या क्षेत्रातील तज्ज्ञ सल्लागार नियुक्त करावा, जेणेकरून त्यांच्या माध्यमातून योग्य बदल आणि व्यावसायिक पद्धतीचा कृती आराखडा तयार करून एनडी स्टुडिओची आर्थिक सक्षमता अधिक वाढवता येईल, अशा सूचना सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी सोमवारी (दि. ६) येथे दिल्या.

मंत्रालयात आयोजित एनडी स्टुडिओच्या अद्ययावतीकरण कामाच्या आढावा बैठकीत मंत्री शेलार बोलत होते. या बैठकीस उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांच्यासह फिल्मसिटी तसेच एनडी स्टुडीओचे संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. (पान २ वर..)

## उपमुख्यमंत्री शिंदेंना धमकी देणारा अटकेत



**ठाणे : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एका तरुणाने समाजमाध्यमांद्वारे शिवीगाळ करत मारण्याची धमकी दिली होती. या तरुणाला ठाणे पोलिसांनी अटक केली आहे.

शिवसेनेतील फुटीनंतर राज्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरुद्ध माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असा सामना रंगला आहे. दोन्ही गटाच्या समर्थकांकडून एकमेकांवरोधात समाजमाध्यमांवर टीका–टिप्पणी केली जाते. असे प्रकार सुरू असतानाच रविवारी ठाण्याच्या पाचपाखाडीमधील हितेश प्रकाश धेंडे (२६) या तरुणाने समाजमाध्यमांवर एक चित्रफित प्रसारित केली. यामध्ये त्याने उपमुख्यमंत्री शिंदे यांना शिवीगाळ करत जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती. पोलिसांनी सोमवारी (दि. ६) सकाळी शोध घेऊन हितेशला अटक केली. त्याने असे कृत्य का केले हे अद्याप समजू शकलेले नसून पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

## निवडक

### छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात नऊ पोलीस शहीद

**विजापूर :** छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात बेद्रे–कुटू मार्गावर सोमवारी (दि. ६) पोलीस कर्मचाऱ्यांना घेऊन येणाऱ्या एका वाहनाला नक्षलवाद्यांनी आयईडी स्फोटाने उडवले. या घटनेत आठ पोलीस आणि एक चालक असे एकूण नऊ जण शहीद झाले आहेत. हे सर्व जण नक्षलविरोधी कारवाई आटोपून परतत होते. दरम्यान, सुरक्षा दलाचे एक पथक घटनास्थळी पाठवण्यात आले आहे.

### मुंबईत एकाच क्रमांकाच्या दोन कार; गुन्हा दाखल

**मुंबई :** एकाच क्रमांकाच्या दोन कार मुंबईतील ताज हॉटेलबाहेर पार्क केलेल्या आढळल्या आहेत. मुंबईवर झालेल्या २६/११च्या हल्ल्याच्या वेळी अतिरेक्यांनी ताज हॉटेलला लक्ष्य केले होते. त्यामुळे कुणी कटकारस्थान तर रचत नाहीये ना, अशी शंका उपस्थित होऊ लागली आहे. या दोन्ही कार मारुती एर्टिगा असून त्यांचा क्रमांक एमएच ०१–ईई २३८८ आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## इंटरनेटच्या युगात शिक्षकांवरील जबाबदारीत वाढ –आमदार संजय केळकर



**पेण, अलिबाग : प्रतिनिधी**

आज इंटरनेटच्या युगात पालक त्यांच्या कामात गुंतलेले आहेत. अशा वेळी शिक्षकांवरील जबाबदारीचे ओझे वाढले आहे. पुढच्या काळात ते आणखी वाढणार आहे. नवी पिढी घडवण्याचे काम करणाऱ्या शिक्षकांनी आता अधिक जबाबदारीने काम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे (प्राथमिक) संस्थापक आमदार संजय केळकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक) रायगड शाखेच्या वतीने रायगड जिल्ह्यातील आदर्श शिक्षक आणि शाळा यांचा गौरव करण्यात आला. पेणमधील रविराज फार्म येथे झालेल्या या सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून आमदार केळकर बोलत होते.

शिक्षण हिताकडे लक्ष देणाऱ्या आदर्श शिक्षकांची आज समाजाला गरज आहे. शिक्षकांच्या हिताचे प्रश्न सोडवण्याकडे आम्ही लक्ष घालू. शिक्षकांच्या मुख्यालयाचा प्रश्न जवळजवळ सुटलेला असून तो लवकरच मार्गी लागेल, असे आमदार केळकर यांनी सांगितले. त्यांनी शिक्षक परिषदेच्या कामाचे कौतुक केले. परिषदेने शिक्षकांचे अनेक प्रश्न हाती घेऊन धसास लावले. या कामाचा एक अहवाल तयार करून तो प्रसिद्ध करावा, अशी सूचना त्यांनी केली. (पान २ वर..)

## मुरूड राजपुरी येथे डोक्यावर नारळ पडून एकाचा मृत्यू

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील राजपुरी येथील एका व्यक्तीचा डोक्यात नारळ पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. जयेश पांडुरंग गीते (वय ४८) असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

जयेश गीते हे मच्छीमार नौकेचे तांडेल आहेत. राजपुरी गावातील शिवमंदिरात रविवारी (दि. ५) अभिषेक, पूजा होती. त्यासाठी नारळ आणण्यास जयेश गीते समुद्र किनारी गेले होते. या वेळी झाडावरून एक नारळ थेट गीते त्यांच्या डोक्यावर पडला. त्यामुळे ते कोसळले व त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या अकस्मिक मृत्युमुळे राजपुरी गावावर शोककळा पसरली आहे.



## शेकापचे कळंबोली शहर संघटक विजय गर्जे भाजपमध्ये दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्षाचे कळंबोली शहर संघटक विजय गर्जे यांनी सोमवारी (दि. ६) पनवेल येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत माजी नगरसेवक बबन मुकादम आणि भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमास भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रिया मुकादम, आदिनाथ जायभाये, लक्ष्मण जायभाय, दिनकर बडे, भाजप कळंबोली शहर चिटणीस मनीष तिवारी उपस्थित होते.

या वेळी शेकापचे कळंबोली शहर संघटक विजय गर्जे यांच्यासह शुभम पाटील, दिनेश निशाद, धवल भट्ट, सद्दाम शेख, अनिश सिंग, मनिंदर सिंग, मनमीत संगेरा, अरनेश मेदी, साहील पवार, आमीर खान, जतिनंदर सिंग, अमरितपाल सिंग, शुभम विश्वकर्मा, संजय माने, प्रफुल्ल शिंदे यांनी भाजमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षात स्वागत केले.

## ग्रामीण भागात थंडीचा जोर वाढला!

### शेकोट्या पुन्हा पेटू लागल्या



**श्रीवर्धन, मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण भागात तापमानामध्ये घसरण होऊन गारठा वाढला आहे. त्यामुळे सकाळी व रात्रीच्या वेळी नागरिकांना हुडहुडी भरते. थंडीमुळे लोक शेकोट्या पेटवताना दिसत आहेत.

हवामान खात्याने नव्या वर्षात थंडीचे पुनरागमन होईल असा अंदाज वर्तवला होता. तो खरा ठरला आहे. हवेत गारवा वाढला आहे. रात्री यात वाढ होते, तर पहाटेच्या वेळी गुलाबी थंडी अनुभवायला मिळत आहे. दिवसभरात वातावरण गरम असले तरी पहाटे व रात्रीच्या वेळी गारठा जाणवतो, जो हवेतील ओलाव्यामुळे तीव्र होतो.

वयोवृद्ध व्यक्ती, लहान मुले यांना या थंडीमुळे शारीरिक त्रास होऊ शकतो. त्यामुळे ते अधिक काळजी घेत आहेत. काही लोक स्वेटर व इतर उबदार कपडे परिधान करून बाहेर पडताना दिसत आहेत.

दुसरीकडे गारव्याबरोबरच धुक्याचे प्रमाणही वाढले आहे, ज्यामुळे पहाटेच्या वेळी कोकणातील नागमोडी वळणांवर गाड्या चालवताना चालकांना अधिक दक्ष राहावे लागत आहे.

## अल्पवयीन मुलगी गर्भवती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराची घटना ताजी असतानाच रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत आणखी एका अल्पवयीन मुलीचे शोषण झाल्याची घटना समोर आली आहे. ही मुलगी गर्भवती असून या प्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित मुलगी अल्पवयीन व अविवाहित आहे हे माहीत असूनदेखील तिच्या अजाणतेपणाचा फायदा घेऊन आरोपीने तिच्याशी शरीरसंबध ठेवले. त्यामुळे ती गर्भवती राहिली आहे. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मुंबई महानगर क्षेत्रात केबल कारचा मानस

### रोप वेच्या माध्यमातून राबवणार प्रकल्प

**मुंबई : प्रतिनिधी**

रस्ते वाहतूक, रेल्वे तसेच मेट्रो यासारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांवरील वाढता ताण लक्षात घेता भविष्यात केबल कार सेवा विकसित होणे आवश्यक आहे. त्यासाठी या प्रकल्पाचे सर्वेक्षण करून विकास आराखडा तयार करणे गरजेचे आहे. केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या भेटीदरम्यान या प्रकल्पाच्या सादरीकरणाद्वारे मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या दृष्टीने या प्रकल्पाची आवश्यकता मांडण्यात येईल, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

नवी दिल्ली येथे ७ जानेवारी रोजी होणाऱ्या विकसित भारत २०४७ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या लक्ष्य प्राप्तीच्या दृष्टीने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सर्व राज्यांच्या परिवहनमंत्र्यांच्या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित राहणार आहेत.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन सादरीकरणानंतर मुंबई महानगर क्षेत्रामध्ये केबल कार प्रकल्प राबवण्यासाठी केंद्र सरकारद्वारे पर्वतमाला परियोजनेच्या अंतर्गत सार्वजनिक खासगी भागीदारी अथवा केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त आर्थिक भागिदारीने रोप वे विकसित करण्याचा मानस असून या संदर्भातील विकास आराखडा तयार करून तत्वत: मान्यता घेण्याचा प्रयत्न राहील, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

मुंबई महानगरास प्राप्त झालेले महत्त्वपूर्ण भौगोलिक स्थान, सागरी किनारा खाडीचा प्रदेश, एलिफंटासारखी प्राचीन लेणी, माथेरानसारखे थंड हवेचे पर्यटनस्थळ, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यासारखी हरित चादर जतन करून मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी रोप वेच्या माध्यमातून केबल कार प्रकल्प राबवणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत परिवहनमंत्री सरनाईक यांनी व्यक्त केले आहे.

#### वाहतूक समस्या सुटण्यास होईल मदत

मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या दृष्टीने केबल कार प्रकल्पाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पालघरपासून रायगड जिल्ह्यातील उरण–पेणपर्यंत पसरलेल्या एकूण क्षेत्रामध्ये नागरीकरणाचा वेग वाढत आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील वाढते नागरीकरण, वाहनांची वाढती संख्या, नवीन रस्ते व रेल्वेसेवा, प्रदूषण याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन आधुनिक तंत्रज्ञान व पाश्चात देशातील यशस्वी नाविन्यपूर्ण प्रकल्पाचा अभ्यास करून वाहतूक समस्या सोडवण्यासाठी ठोस प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

# आपलं सरकार वेब पोर्टल आता सक्षम आणि नव्या स्वरूपात

## ॲप तयार करून मोबाईलवर सुविधा उपलब्ध करा –मंत्री आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या ४८५ सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देणारे आपलं सरकार (१.०) वेब पोर्टल अधिक सक्षम, अद्ययावत करुन नव्या स्वरूपात तयार करा. त्याचबरोबर नागरिकांना जलद माहिती उपलब्ध होण्यासाठी आपलं सरकारचे 'ॲप ' तयार करून या सुविधा मोबाईलवर उपलब्ध होतील, या दृष्टीने नियोजन करा, असे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सोमवारी (दि.६) विभागाला दिले.



मंत्रलायात झालेल्यामाहिती तंत्रज्ञान विभागाच्या बैठकीत मंत्री शेलार यांनी विभागाला निर्देश दिले.यावेळी माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटीया, राष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्थेच्या संचालक सपना कपूर, महा आयटीचे प्रकल्प अधिकारी राहुल सुर्वे, महा आयटीचे प्रकल्प अधिकारी किरण पाटील, कक्षा अधिकारी सोमकुंवर याबरोबर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या ४८५ सेवा नागरिकांना आपलं सरकार वेबसाईटच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येत असून अन्य राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र ८ व्या क्रमांकावर आहे. जम्मु काश्मीर, तमिळनाडू आणि कर्नाटक ही राज्ये ऑनलाईन सेवा देण्यात आघाडीवर आहेत. त्याचा अभ्यास करुन महाराष्ट्र शासनाने ४८५ व्यतिरिक्त २८५ नविन सेवा ऑनलाईन देण्याची तयारी केली असून लवकरच या सुविधा उपलब्ध होतील. यावर महाराष्ट्र शासनाचे विविध विभाग आणि शासनाची महाआयटी कंपनी काम करीत आहे. या सेवा कार्यान्वित झाल्यानंतर ७७० सेवा ऑनलाईन देणारे देशातील ऑनलाईन सेवा देणाऱ्या पहिल्या पाच राज्यांमध्ये आपले राज्य येईल. या दृष्टीने विभागाने तयारी सुरु केली आहे.

या वेळी मंत्री ॲड आशिष शेलार म्हणाले की, आपलं सरकार ही वेबसाईट अपग्रेड करुन नव तंत्रज्ञानाचा वापर करून वेबसाईट नव्या स्वरूपात तयार करण्याची गरज आहे. नागरिकांना जलद सुविधा उपलब्ध होतील, तसेच कोणत्याही सेवा सुविधेसाठी अर्ज करताना वेबसाईटवर वापरण्याची पध्दत सुलभ असायला हवी, तसेच अधिक क्षमतेचा रॅम वापरून चॅट बॉट सारख्या सुविधांसह ए आय चा वापर करुन त्या वेबसाईटवर वर असाव्यात. तसेच आपलं सरकारचे एक मोबाईल ॲप तयार करुन तांत्रिकदृष्ट्या विचार करुन सुविधा पवरुन उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

केंद्र सरकारने डेटा सुरक्षेसाठी तयार केलेल्या कायद्यानुसार राज्याचा स्टेट ओन क्लाउड तयार करा, असे निर्देश ही मंत्र्यांनी दिले.

# धाटाव येथे पं. दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग व रोहा इंडस्ट्रीज आसोसिएशन, धाटाव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांरिता ३० जानेवारी रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत इंडस्ट्रीज आसोसिएशन धाटाव येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित केला आहे.

जिल्ह्यातील सर्व खासगी उद्योजकांनी आस्थापनेतील कुशल/अकुशल रिक्तपदे जास्तीत जास्त या कार्यालयास कळवावीत. शासनाच्या माध्यमातून खासगी कंपन्यातील जास्तीत–जास्त रिक्तपदे रोजगार मेळाव्यातून भरती करण्यात येणार आहे. याकरिता या विभागाचे संकेतस्थळावर https://rojgar.mahaswayam.gov.in नोंदणी केलेल्या आस्थापनांनी प्रथम आपल्याकडे हवे असलेले कुशल/अकुशल मनुष्यबळाची माहिती भरावी.

संकेतस्थळावर नवीन नोंदणी करणे व रिक्तपदे अधिसूचित करणे या संदर्भात काही समस्या असल्यास या कार्यालयाशी ०२१४१–२२२०२९ किंवा महेश भा.वखरे, लिपिक–टंकलेखक यांच्याशी ९४२१६१३७५७ संपर्क साधावा, असे आवाहन अ.मु. पवार,सहायक आयुक्त,कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी केले आहे.

पान १ वरुन

## एनडी स्टुडिओच्या अद्ययावतीकरणासह व्यवसाय वृद्धीसाठी सल्लागार नियुक्त करावा

मंत्री शेलार म्हणाले की, मराठी निर्माते, कलाकार, तंत्रज्ञ यांना सहाय्यक ठरतील अशा पूरक सुविधा उपलब्ध करून देण्याची भूमिका राज्य शासनाची व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. त्या दृष्टीने एनडी स्टुडिओचे अद्ययावतीकरण हे भविष्यातील सिनेमा व मनोरंजन क्षेत्रातील बदल लक्षात घेऊन करण्यात यावे. याच्या परिपूर्ण आराखडा निर्मितीसाठी तज्ज्ञ सल्लागारांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. या स्टुडिओच्या माध्यमातून जास्तीत जास्त रोजगार संधी निर्माण करण्यास भर देताना त्यात स्थानिकांना प्राधान्य द्यावे तसेच या स्टुडिओत उपलब्ध रिकाम्या जागेचा अधिक योग्य वापर करण्याच्या दृष्टीनेही नियोजन करावे. या ठिकाणी बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करून जास्तीत जास्त संख्येने पर्यटक, व्यावसायिक, निर्माते यांचा वावर वाढवण्यासाठी त्यात प्रामुख्याने मराठी सिरियल्स, सिनेमा, वेब सिरीज, ओटीटी माध्यमात काम करणारे निर्माते, कलाकारांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या, अशा सूचना ना. शेलार यांनी संबंधितांना दिल्या.

## नमो चषक भव्य दिव्य स्वरूपात होणार -लोकनेते रामशेठ ठाकूर

मागील नमो चषक महोत्सवात नमो खारघर मॅरेथॉन, नमो खारघर हिल ट्रेकिंग, नमो सायक्लोथॉन, दिवस रात्र टेनिस क्रिकेट, चित्रकला, वक्तृत्व, फुटबॉल, कुस्ती, कबड्डी, बुद्धीबळ, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, ज्युडो, किक बॉक्सिंग, कॅरम, तायक्वांदो, खो–खो, रस्सीखेच, रांगोळी, गायन, नृत्य अशा २१ प्रकारात स्पर्धा झाल्या. यंदा नमो चषक २०२५ स्पर्धा अधिक उत्साहाने आणि भव्य स्वरूपात होणार आहे. विविध स्पर्धांसोबत राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धाही आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विविध समित्यांचा आढावा घेत उत्कृष्ट नियोजनासाठी मार्गदर्शक सूचना केल्या.

## इंटरनेटच्या युगात शिक्षकांवरील जबाबदारीत वाढ -आमदार संजय केळकर

ग्रामीण भागातील शाळांना शासनाकडून मिळणारा निधी अपुरा आहे. इथल्या लोकप्रतिनिधींनी कंपन्यांच्या सीएसआर फंडातून शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर नैतिक मूल्यांची अधिक प्रमाणात रुजवून करणे काळाची गरज आहे, असेही ते म्हणाले.

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष ॲड. नीलिमा पाटील यांनीदेखील शिक्षक परिषदेच्या कामाचे कौतुक करताना शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक ते सर्व करण्याचे आश्वासन दिले. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मिळणारे शिक्षण दर्जेदार असते, असे सांगून कमी पटाच्या शाळा बंद करण्याच्या धोरणामुळे ग्रामीण, दुर्गम भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील अशी भीती व्यक्त करून हे धोरण राबवू नये, अशी सूचनाही त्यांनी केली.

शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष उदय गायकवाड यांनी प्रास्ताविकात परिषदेच्या कामगिरीचा थोडक्यात आढावा घेतला तसेच हे आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यामागचा हेतू स्पष्ट केला.

या कार्यक्रमात १५ गुणवंत शिक्षक, १६ गुणवंत शिक्षिका आणि १४ शाळांचा आदर्श पुरस्काराने सन्मान करण्यात आला. परिषदेच्या रायगड शाखेच्या वतीने काढण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

राज्य नेते संजय निजापकर, नरेंद्र गुरव, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, पेण पतपेढीचे माजी अध्यक्ष ल.शं. जंगम, राज्य प्रसिद्धी प्रमुख वैभव कांबळे, कमल केळकर, ज्येष्ठ नेते नरेंद्र गुरव, माजी नगरसेवक शोमेर पेणकर, शिक्षक परिषदेचे कोकण उपाध्यक्ष सुजित बनगर, कार्याध्यक्ष संदीप शिंदे, जितेंद्र बोडके, विजय गायकवाड व्यासपीठावर उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिन पूर्वतयारी बैठक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या अनुषंगाने सोमवारी (दि.६) पूर्व तयारीची बैठक कोकण विभागाच्या सामान्य शाखेचे अपर आयुक्त संजीव पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

कोकण भवनातील सभागृह येथे झालेल्या या बैठकीत सिडको अग्निशमन विभागाचे मुख्य अधिकारी विजय राणे, उद्यान अधीक्षक विशाल भोर, पनवेल महापालिकेचे दशरथ भंडारी, नवी मुंबई महापालिका शिक्षण विभागाच्या सुलभा बारघरे, रायगड विद्युत विभागाच्या कार्यकारी अभियंता एस.डी कट्टी, बृहन्मंबई राज्य कर्मचारी संघटनेचे उपाध्याक्षा अस्मिता जोशी, कोकण भवन विद्युत विभागाचे उप अभियंता प्रविणकुमार शिवदास व अन्य अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावरील मुख्य शासकीय ध्वजारोहण कळंबोली पोलीस मुख्यालय मैदानावर होणार आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे – शिवकर, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७४ | ०–३७–६०<br>पो.ख. ०–०६–६०<br>**एकूण ०–४४–२०**<br>**पैकी ०–१६–००** | ७.८९ | बबन मारुती ढवळे<br>भगवान मारुती ढवळे<br>जनाबाई बबन पाटील<br>राधा मारुती ढवळे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०६/०१/२०२५.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१

### सहनिबंधक सहकारी संस्था (सिडको)

यांचे कार्यालय
शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत
बेलापुर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, पाचवा मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
ई–मेल : jointregcidco@gmail.com

जा.क्र. सनि/ससं/सिडको/ /२०२५/१६०४ दिनांक :– ०६/१/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११ (२) व नियम (२) अन्वये जाहीर नोटीस**

चेअरमन/सेक्रेटरी/खजिनदार,
हिराजी खारकर रेडियन्स स्प्लेंडर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
भुखंड क्र. ६४ व ६४ए, सेक्टर– ०५, उलवे,
नवी मुंबई – ४१०२०६ — **अर्जदार**

**विरुध्द**

१) मे. रेडियन्स प्रापर्टीज लि.
९०५/९०६, लेवल–०९, मैथिलीस सिग्नेट
भुखंड क्र. ३९४, सेक्टर– ३०ए, वाशी,
नवीमुंबई– ४००७०२
२) १. श्री. अशोक हिराजी खारकर २. श्री. मोहन हिराजी खारकर (मयत) ३. श्रीम. शारदा हिराजी खारकर (मयत) यांचे वारस ४. श्री. रवी मोहन खारकर ५. श्री. समिर मोहन खारकर ६. श्रीम. सिमा मोहन खारकर ७. श्री. चिंतामण हिराजी खारकर (मयत) यांचे वारस श्रीमती ताराबाई चिंतामण खारकर श्री. आनंद चिंतामण खारकर, श्रीम. लक्ष्मी चिंतामण खारकर, श्रीमती दमयंती चिंतामण खारकर, श्री. महेंद्र चिंतामण खारकर श्री. दिपक चिंताकण खारकर. — **जाब देणार**

०२) मा. व्यवस्थापक (शहर सेवा–२)
सिडको लि, सिडको भवन, पाहिला मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

हिराजी खारकर रेडियन्स स्प्लेंडर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., भुखंड क्र. ६४ व ६४ए, सेक्टर–०५, उलवे, नवीमुंबई – ४१०२०६ या संस्थेचा महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११ (२) व नियम (२) बाबतचा अर्ज दिनांक ०७/११/२०२४ रोजी या कार्यालयात प्राप्त झालेला आहे.

१) अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.
२) जाब देणार यांनी त्यांच्या बचावासाठी व्यक्तीश: किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधमार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.
३) आपणाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर विचारात घेवून प्रकरणातील सुनावणी **दिनांक २०/०१/२०२५ रोजी सकाळी / दुपारी १२.०० वाजता** निश्चित करण्यात येत आहे.
४) आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर सदर प्रकरणाची सुनावणी घेवून उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
५) आपणास सुनावणीचे वेळी पुर्वी १० मिनिटे अगोदर प्रवेश दिला जाईल. सुनावणी वेळेनंतर प्रवेश दिला जाणार नाही व सुनावणीस आपण गैरहजर आहात असे गृहीत धरण्यात येईल.
७) सुनावणीच्या वेळी एका पक्षकाराच्यावतीने जास्तीत जास्त दोन व्यक्तींना प्रवेश दिला जाईल.
८) सदर प्रकरणी मयत पक्षकारांचे वतीने त्यांचे वारसास पक्षकार म्हणून समाविष्ठ करणेत यावे.

**सही/–**
**सहनिबंधक**
सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई

### जाहीर नोटीस

**उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३५०/२०२४
नि. ८/ड
ने.ता. २१/०२/२०२५

१. श्रीमती वनीता शिवदास पाटील
वय : ४९ वर्षे, गृहीणी,
२. कु. पूजा शिवदास पाटील
वय: ३१ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
वरील क्र. १ व २ रा. धुतूम, पो. जासई,
पीन कोड ४१०२०६ ता. उरण, जि. रायगड ............. **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ............... **सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीव्दारे असे कळविण्यात येते की, या मे. न्यायालयाच्या स्थळ सीमेंत असलेली पुढील वर्णनाची मिळकत नवीन मुंबई प्रकल्पाकरीता संपादीत झालेली आहे. सदर मिळकतीचे भुसंपादन कायद्याप्रमाणे ॲवार्ड कै. विठ्ठल गोविंद पाटील यांचे नावे झालेले आहेत. कै. विठ्ठल गोविंद पाटील यांचे मृत्यूपश्चात मा. उरण न्यायालयातील, दिवाणी चौकशी अर्ज क्र. १६२/२०१४ मधील दिनांक १६/१२/२०१४ रोजी अर्जदारांच्या पतीचे कै. शिवदास विठ्ठल पाटील (मृत्यू दिनांक २६/०९/२०२४) यांचे नावे वारस दाखल्याचा अर्ज सामईकरीत्या मंजूर करण्यांत आलेला आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे: शेमटीखार, मुठेखार, नवघर, ता. उरण, जि. रायगड.**

| मौजे व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| मौजे शेमटीखार यु.के. नं. ९०/९१–९२ | ७ | ६ | ०–०८–१ |
| | १ | १ | ०–०७–६ |
| | ३ | १ अ | ०–१६–७ |
| मौज मुठेखार यु.के. नं. २०/८५–८६ | ७ | ३ क २ | ०–८४–५ |
| मौजे नवघर यु. के. नं. ४१५/८५–८६ | ३८२ | १ अ | ०–१२–१ |
| | ३८६ | ७ क | ०–१५–० |
| | ३५६ | ९ | ०–०२–८ |
| | ३५८ | ४ | ०–०८–६ |
| | ३६२ | १ अ | ०–२५–० |
| | ३६७ | ६ अ | ०–१६–० |
| | ३५९ | ५ ब | ०–१९–८ |
| | ३७१ | २ | ० –१२–६ |
| | ३७३ | ३ ब | ०–०५–० |
| | ३७४ | ५ | ०–०९–६ |
| | ३८४ | २ | ०–१२–९ |
| | ३७६ | ४ | ०–११–९ |
| | ३७९ | १० ब | ०–०२–५ |
| | ३७३ | ४ | ०–०५–० |
| | ३७२ | ७ ब | ०–०५–० |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क. १ आणि क्र. २ हे कै. शिवादास विठ्ठल पाटील यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना. कोर्टात प्रस्तूतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबददल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकिलांमार्फत न्यायालयांत हरकत न घेतल्यास ना. कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरिल अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

आज ता. ४/१/२०२५ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/–**
**क. लिपिक**
दि.न्या. कनिष्ठ स्तर
उरण

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सह–अधिक्षक**
दि.न्या. कनिष्ठ स्तर
उरण

### ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद

**ता. पनवेल, जि. रायगड**

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**डिसेंबर २०२४**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंतरा अमोल इंदुलकर | रेखा रमण इंदुलकर | पवल–४–५४३४–२०२४ | २४/०३/२०२४ | सदनिका नं.२:२, दुसरा मजला, बि.नं.७ मुरलीधर को.हौ.सो., मौजे पाली देवद |
| २ | सविता महादेव चव्हाण | महादेव कृष्णा चव्हाण | वारस दाखला एम.ए. नं. ११९०/२०२३ व संमतीपत्र | १४/०९/२०२४ | सदनिका नं.७, पहिला मजला,बि.नं.३, स्नेहमिलन को.हौ.सो.,मौजे पाली देवद |
| ३ | प्रेम सुनिल माने/ वैशाली सुभाष चव्हाण | आनंद बाळकिसन झवर/ सपना आनंद झवर | पवल–५–६३४–२०२४ | १४/०१/२०२४ | सदनिका नं. के २९०४, २९ वा मजला, के विंग, बालाजी सिम्फोनी को. हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ४ | श्रावण कुमार सेवक | नरेश देवीलाल गुर्जर | पवल–१–९३९२–२०२४ | २६/१२/२०२४ | दुकान क्र.१५, तळ मजला, पुष्पश्री को.हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| ५ | कल्पेश काशिराम तटकरे/ वैष्णवी कल्पेश तटकरे | मे.रामरत्न बिल्डर्स तर्फे भागीदार विनोदकुमार जैन | पवल–३–१८०५३–२०२२ | २१/१०/२०२२ | सदनिका नं. १०९, पहिला मजला,बी विंग, श्री वसंतविहार को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ६ | रुपेश बालाराम खडतर/ रुही रुपेश खडतर | महादेव नारायण मोरे | पवल–१–८०१६–२०२४ | २५/१०/२०२४ | सदनिका नं. २०२, दुसरा मजला, सी विंग, बि.नं. ०१, स्वानंदभूमी को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| ७ | रीना महादेव पाटील | नजमुद्दीन बशीर मगनाके | पवल–१–८५३३–२०२४ | २२/११/२०२४ | सदनिका नं. जी १०१, पहिला मजला, जी विंग, समृद्धभूमी को. हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| ८ | सुलोचना महादेव ऐनकर | घनश्याम जिजाबा सावंत/ भाग्यश्री घनश्याम सावंत | पवल–१–७४०५–२०२४ | ०३/१०/२०२४ | सदनिका नं. १०५, पहिला मजला,बी विंग, अंजनी कॉम्प्लेक्स, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ९ | कृष्णा सोपान खंदारे/ वनिता कृष्णा खंदारे | राजेंद्र जवानमल गांधी | पवल–२–१२५५८–२०२३ | २०/०७/२०२३ | सदनिका नं. ३०१, तिसरा मजला, न्यू सिद्धी विनायक को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १० | यश किरण परुळकर/ तेजल यश परुळकर | गणेश आनंद पेडामकर | पवल–५–१३४३४–२०१८ | १६/१२/२०१८ | सदनिका ए २०३, दुसरा मजला, ए विंग, विठोबा कॉम्प्लेक्स को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ११ | परिणीता शालिमार पाटील | शालिमार किसन पाटील | पवल–१–३४९५–२०२१ | ३१/०३/२०२१ | सदनिका ए ४, तळ मजला, ए विंग,बि.नं. ई २, स्नेहकुंज को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १२ | सागर सखाराम मापारी/ संगीता सखाराम मापारी | दिपक कृष्णा वाघमारे/ कृष्णा लिंबाजी वाघमारे | पवल–४–६९३७–२०२१ | ०८/०७/२०२१ | सदनिका नं. बी १०२, पहिला मजला, गंगाधाम बि.नं. २ को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १३ | मुनीर अय्युब सुर्वे | स्कीटर फर्नांडीस आणि वेलफ्रेड जोसेफ फर्नांडीस तर्फे अखत्यारी म्हणून मुनीर अय्युब सुर्वे | पवल–१–९१०९–२०२४ | १६/१२/२०२४ | रो हाऊस नं. ०२, फेज ४, विघ्नहर्ता इन्क्लेव्ह को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १४ | संजय सुरेंदर शर्मा/ ज्योती संजय शर्मा | सुचेता विनोद गुप्ता | पवल–३–११४७६–२०२३ | २३/०६/२०२३ | सदनिका नं. २०१, दुसरा मजला,बि.नं.१, श्रध्दा संकुल को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १५ | संगीता जयंत जोशी/ जयश्री रुपेश नानल/ वैदेही राहूल पाटील | रुपेश सदाशिव नानल/ सदाशिव रामचंद्र नानल | पवल–३–१४८८४–२०२४ | २२/०७/२०२४ | सदनिका नं. २१०७, २१ वा मजला, के विंग, बालाजी सिम्फोनी को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १६ | इसाकिदास सुब्रमाण्यन कोणार | हरिश्चंद्र बाळाराम ठाकूर | पवल–३–१३५४९–२०२३ | २१/०७/२०२३ | सदनिका नं. बी १०३, पहिला मजला, बी विंग. कार्तिक्य गार्डन को.हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| १७ | राजू प्रसाद/रेणू देवी | वैभव वामन फासे/ विजया वामनराव फासे | पवल–५–१३८००–२०१९ | २८/१२/२०१९ | सदनिका नं. ए १०१, पहिला मजला, ए विंग. बि.नं. २, कार्तिकेय पार्क को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १८ | किशोर सिंह चुण्डावत/ खुम सिंह नाहर सिंह राठोड | शांताबाई धाऊ घरत | पवल–१–९३९४–२०२४ | २६/१२/२०२४ | घर मिळकत क्र. २६५/अ/१ मधील गाळा क्र. १, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १९ | शांती अखिलेश पांडये | अखिलेश खंद्रशेखर पांडये | ॲफेडेव्हिट नं.७९१५/२०२४ नोटरी रजिस्टर अनुक्रमांक २५५४/२०२४ | २८/०६/२०२४ व ०९/१२/२०२४ | सदनिका नं. २०१, बि.नं. ई २, स्नेहकुंज को.हौ.सो. मौजे पालीदेवद |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/–**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

## निवडक

### वाहनचालकाला लुटणारे गजाआड

**पनवेल :** पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेवरील पनवेल एक्झिट येथे पिकअप घेऊन जाणारा चालक हा लघुशंकेसाठी थांबला असताना त्याला मारहाण करून तसेच पाठीवर स्क्रु ड्रायव्हरने मारून जखमी करून त्याच्याकडील रोख रक्कम एक हजार रुपये व इतर कागदपत्रे चोरून नेणाऱ्या त्रिकुटापैकी दोघांना पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे. अमित गायकवाड (वय ३२) या वाहन चालकावर ठिकाणी हल्ला करण्यात आल्यानंतर याबाबतची तक्रार त्याने तालुका पोलीस ठाण्यात देताच पोलिसांच्या पथकाने गुन्ह्यातील आरोपी विशाल जाधव व संदीप पवार या दोघांना ताब्यात घेतले असून त्यांच्या तिसऱ्या सहकार्याचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

### सुरक्षा रक्षकाला मारहाण

**पनवेल :** सुरक्षारक्षकाला प्लास्टिक पाईपने मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोपट आव्हाड हे रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळात सुपरवायझर आहेत. ते एनएमएमटी बस आगार आसुडगाव येथे काम करतात. २ जानेवारी रोजी ते मोटरसायकलने घोटकॅम्प येथील घरी जाताना तीन ते चार अनोळखी व्यक्तींनी आव्हाड यांना प्लास्टिकच्या पाईपने मारहाण केली.

### डंपरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** डंपरची एका तरुणाला धडक बसल्याने त्यात तरुणाचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी मोहम्मद अश्रफ याच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. डंपरच्या चालकाने नेवाळी गाव क्रिकेट मैदानाजवळ नेवाळी या ठिकाणी क्रशर प्लांट कडून टेंभोडेकडे जाणाऱ्या रस्त्यावर भरधाव वेगाने डंपर चालवला आणि तारीफ गुलजार हुसेन खान याला पाठीमागून धडक दिली. यात तारीफच्या डोक्याला जबर मार लागला. त्याला पनवेल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### सोन्याची चेन खेचून चोरटे पसार

**पनवेल :** ६३ वर्षीय सुजाता ठक्कर या पनवेल येथे राहत असून त्या बिल्डिंगच्या पायरीजवळ आले असता पाठीमागून एक व्यक्ती आला. त्याने जबरदस्तीने ठक्कर यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचली. धक्का मारून त्यांना खाली पाडले आणि तो पळून गेला. या वेळी मोटरसायकलच्या मागे बसून दोघेही व्यक्ती पळून गेले. २७ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन चोरून नेणाऱ्या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# एचएमपीव्ही व्हायरस; पनवेल मनपा सतर्क

## नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर फैलाव झालेल्या एचएमपीव्ही (एचएमपीव्ही) या व्हायरसच्या अनुषंगाने भारतातही एक रुग्ण आढळून आला आहे तसेच महाराष्ट्रात आतापर्यंत एचएमपीव्हीचा एकही रुग्ण आढळलेला नाही. या पार्श्वभूमीवर राज्यातील आरोग्य विभाग अलर्ट झाले असून पनवेल महापालिकेच्या वतीने योग्य ती काळजी घेण्यात येत आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

सध्या चीनमध्ये मानवी मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) याचा उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत. मानवी मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) तीव्र श्वसन संसर्गाचे एक प्रमुख कारण आहे. हा विषाणू सर्वप्रथम नेदरलँडस मध्ये २००१ मध्ये आढळला. मानवी मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे. ज्यामुळे व श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरते. हा एक हंगामी रोग आहे जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवतो.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

**हे करा :** १. जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.
२. साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवा.
३. ताप, खोकला व शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.
३.भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक खा.
४. संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्या.

**हे करू नये :** १. हस्तांदोलन, २. टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर
३. आजारी लोकांशी जवळचा संपर्क
४. डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे.
५. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे.
६. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेणे.

# कळंबोलीत सावता माळी समाजातर्फे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कार्यक्रम





**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, क्रांतिसूर्य महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपले दैवते असून त्यांच्या विचारांची जोपासना करावी, असे आवाहन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा आमदार छगन भुजबळ यांनी कळंबोलीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजीत केलेल्या कार्यक्रमात केले.

श्री संत सावता माळी समाज विकास मंडळाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४व्या जयंतीच्या निमित्ताने कळंबोलीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा आमदार छगन भुजबळ आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

### मान्यवरांची उपस्थिती

या वेळी भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, तेजस कांडपीळे, माजी नगरसेविका मोनिका महानवर, प्रमिला पाटील, सावता महाराज वसेकर, प्रभू महाराज, उद्धव भुजबळ, बापू भुजबळ, किरण झोडगे, रघुनाथ ढोक, नितीन जाधव, प्राध्यापक अमर हजारे, सुरेश जाधव, वैशाली भुजबळ, अमोल बोचरे, प्रकाश महानवर, गणेश जांभुळकर, तेजस कांबळे, देवकी शिंदे, जयराम डोके, लहूशेठ मलकमिर, उत्तमराव शिंदे, रवी पाटील, मोनिका काळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# वैष्णवी चव्हाणचे अबॅकस, अंकगणित स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर येथील इयत्ता नववीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी वैष्णवी चव्हाण, हिच्या उल्लेखनीय कामगिरीने देशाला व शाळेला आंतरराष्ट्रीय वैभव मिळवून दिले. २६ डिसेंबर २०२४ रोजी व्हिएतनाम येथे आयोजित प्रतिष्ठित २२व्या पामा ग्लोबल अबॅकस आणि अंकगणित स्पर्धा २०२४च्या स्पर्धेत तिने सहभाग घेतला.

मानसिक अंकगणित आणि अबॅकस है शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी वचन बद्ध असलेल्या पामा ग्लोबल संस्थेने आयोजित केलेल्या या वार्षिक स्पर्धेत २८ देशातील ४००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये वैष्णवी चव्हाण हीने चमकदार कामगिरी करून शेवटच्या लेव्हल-ई मध्ये अपवादात्मक गणना कौशल्य दाखवुन प्रथम उपविजेता ट्रॉफी मिळविली. तिने केलेली उत्कृष्ट कामगिरी समर्पण, बुद्धिमता आणि कठोर परिश्रम हयाद्वारे तिने हे यश संपादन केले.

वरील विद्यार्थिनीचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी तिचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

# 'सीकेटी'मध्ये सुज्ञ ग्राहक आणि स्मार्ट गुंतवणूकदार विषयावर कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजतध्ये आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि ग्राहक मार्गदर्शन सोसायटी ऑफ इंडिया सिक्युरिटीज, एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.६) सुज्ञ ग्राहक आणि स्मार्ट गुंतवणूकदार या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी आजीवन अध्ययन व विस्तार विभागचे समन्वयक प्रो. डॉ. बी. एस.पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ. भक्ती मुलचंदानी (वित्त सल्लागार - सेबी) डॉ. टी.आर. पांडे (प्रकल्प व्यवस्थापक - ग्राहक मार्गदर्शन सोसायटी ऑफ इंडिया -मुंबई), डॉ. टी.आर. पवार (सीजीएसआय-मुंबई) यांनी सर्व विद्यार्थ्यांना सुज्ञ ग्राहक आणि स्मार्ट गुंतवणूकदार या विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात सुज्ञ ग्राहक कसा असावा आणि स्मार्ट गुंतवणूकदार कसे बनावे यासाठी सेबीचे भांडवल बाजारातील कार्य कसे चालते याबाबत विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी आजीवन अध्यन व विस्तार विभागाच्या एकूण १७१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आय.क्यू.ए.सी.समन्वयक प्रो.डॉ. बी.डी.आघाव, यांनी कौतुक केले. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. एच.एस खरात, डॉ. के.बी.ढोरे, प्रा.अतुल घाडगे, प्रो. कुशल कुराणी, प्रा. पूनम शिंदे, अनुप्रिता वाठारकर, प्रा. स्नेहा आर. पारिंगे आणि प्रा. नेहा एस. पोरजी, प्रा.स्वेता व्ही. हुंबरवाडी, आणि प्रा. सागर व्यवहारे, यांनी अथक परिश्रम घेतले.

# पत्रकारांतर्फे तृप्ती पालकरांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

पत्रकार दिनानिमित्त पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या वतीने मराठी वृत्तपत्र क्षेत्राचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबरीने या दिनाचे औचित्य साधून एनडीटीव्ही मराठी वृत्तवाहिनीच्या वृत्त निवेदिका तृप्ती पालकर यांचा सत्कार करण्यात आला.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंच्यच्यावतीनेही विविध उपक्रमे राबवित सामाजिक बांधिलकी जपली जाते. त्याप्रमाणे पत्रकार दिनानिमित्त दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. पालकर यांचा मंचाचे सल्लागार ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील व डॉ. संजय सोनावणे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या वेळी मंचाचे खजिनदार संजय कदम, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, सरचिटणीस हरेश साठे, सदस्य प्रवीण मोहोकर, दीपक घोसाळकर, राजू गाडे, दत्तात्रेय कुलकर्णी यांच्यासह सदस्यांनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.



# गव्हाण विद्यालयात पोलीस रेझिंग डे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत न्हावा शेवा पोलीस वाहतूक शाखा, उलवे बीटच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये 'पोलीस रेझिंग डे' निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

न्हावा शेवा पोलीस ठाणे उलवे बीटचे पोलीस हवालदार प्रेमनाथ मोकल,पोलीस नाईक किरण म्हात्रे,पोलीस शिपाई मयूर पाटील आणि प्रफुल शिंदे यांनी यावेळी रेझिंग डे बद्दल विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले. पोलीस नाईक किरण म्हात्रे यांनी रेझिंग डेविषयी माहिती सांगताना दोन जानेवारी १९६२ रोजी महाराष्ट्र पोलीस दलाला नवीन निळ्या रंगाचा ध्वज देण्यात आल्यामुळे २ ते ८ जानेवारी हा सप्ताह 'रेझिंग सप्ताह' म्हणून साजरा करण्यात येत असल्याची माहिती सांगितली.

या वेळी वाहतुकीचे विविध नियम विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यावेत यात प्रामुख्याने हेल्मेट सक्ती, रस्त्याच्या उजव्या बाजूने चालणे, सीट बेल्ट बांधणे, वाहनाचा वेग नियंत्रित ठेवणे,रस्ता ओलांडताना झेब्रा क्रॉसिंग चा वापर करणे, वाहन चालविताना मोबाईल न वापरणे, सिग्नल नियमांचे काटेकोरपणे पालन करणे तसेच इतर सर्व वाहतूक नियमांचे व्यवस्थित आणि काटेकोर पालन करून आपले आणि इतरांचे जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सूचना देवून प्रबोधन करण्यात आले.

प्रास्तविक विद्यालयाच्या गुरुकुल विभागाचे प्रमुख आणि आर.एस.पी.विभागाचे प्रशिक्षक संदीप भोईर यांनी केले तर विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका द्रौपदी वर्तक यांनी आभार मानले.

# ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३८वे पुष्प झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रामध्ये झालेल्या या कार्यक्रमात पनवेल येथील प्रसिद्ध गायिका संध्या आघारकर-घाडगे यांनी गायन सेवा सादर केली.

आपले वडील कै. प्रभाकर आघारकर तसेच कै. शैलजा तळेकर व कै. चारुशीला दिवेकर यांच्याकडून गायनाचे शिक्षण घेतलेल्या संध्या घाडगे यांनी आपल्या संगीत सभेची सुरुवात पूरिया धनश्री या रागाने केली. त्यानंतर त्यांनी रामाचे भजन, जनी म्हणे पांडुरंगा, नाम गाऊ नाम घेऊ, बोलावा विठ्ठल हे अभंग सादर केले.

नंतर त्यांनी संगीत मंदरमाला नाटकातील 'सोहम हर डमरू वाजे' व 'मन हो राम रंगी रंगले' हे नाट्यगीत सादर केले. त्यानंतर त्यांनी 'अवघा तो शकुन' व 'पद्मनाभा नारायणा' हे अभंग सादर करून 'राम नाम ज्याचे मुखी' या भैरवी रागातील अभंगाने संगीत सभेची सांगता केली.

संध्या घाडगे यांना नंदकुमार कर्वे यांनी संवादिनी, गणेश घाणेकर यांनी तबला, मंगेश साळुंखे यांनी पखवाज, प्रतिक जेऊर्गी यांनी तालवाद्य आणि चेतना वालावलकर यांनी तानपुरासाथ केली. समीर सोमण यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. किरण गोखले यानी ध्वनिसंयोजन केले. ही सभा यशस्वी होण्यासाठी मठातील कार्यकर्ते आणि संगीत सभेच्या आयोजकांनी मोलाचे योगदान दिले.



# 'अल्फोन्सो स्टील'विरोधात ग्रामस्थांचे आंदोलन | आमदार प्रशांत ठाकूर यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा एमआयडीसीमधील अल्फोन्सो स्टील प्रायव्हेट लिमिटेड कंपनी व्यवस्थापनाच्या विरोधात ग्रामस्थांनी धडक आंदोलन सोमवारी पुकारले होते. या आंदोलनामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत आंदोलनकर्त्यांसोबत संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

दरम्यान, पोलिसांच्या मध्यस्तीने हे आंदोलन मागे घेण्यात आले असून कपंनी व्यवस्थापनाला ७ दिवसांचा वेळ देण्यात आला आहे. या आंदोलनावेळी भाजप युवा मोर्चाचे दिनेश खानावकर, संतोष भोईर, विनोद पाटील, कृष्णा पाटील, अशोक साळुंखे, अ‍ॅड. पवन भोईर, नितेश खानावकर, विशाल खानावकर, विनोद खानावकर, वैभव भोईर, सचिन पाटील, यशवंत खानावकर, विशाल खानावकर, ज्ञानेश्वर पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात लेखन स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.६) स्टँडर्ड क्लब, विज्ञान संघटना व ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने बीआयएसच्या फाउंडेशन दिनानिमित्त महाविद्यालयात लेखन स्पर्धेचे आयोजन केले होते.

डॉ. रवी प्रकाश यांनी महाविद्यालयात मार्गदर्शन केले. या लेखन स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा घेण्यात आली तसेच त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आली.

या स्पर्धेचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन व प्रा. राजश्री म्हात्रे यांनी केले तसेच सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

# बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महापालिकेच्या वतीने मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सोमवारी (दि.६) पत्रकार दिनानिमित्त आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रतिमेस आयुक्त मंगेश चितळे व जेष्ठ पत्रकार सुनील पोतदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी उपस्थित पत्रकार बांधवांना आयुक्तांनी पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, बाबासाहेब राजळे, डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, जनसंपर्क विभागप्रमुख प्रफुल घरत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते तसेच मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

## संपादकीय

# घबराटीचे कारण नाही

चीनमध्ये एचएमपीव्ही विषाणूच्या फैलावाने आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या वृत्ताने गेल्या आठवडाभरापासून जगभरात काहिसे भीतीचे वातावरण पसरले आहे. चीनने मात्र ही हिवाळ्यातली साथ असल्याचे म्हटले असून जगभरातील अनेक तज्ज्ञही एचएमपीव्हीचा विषाणू अनेक वर्षे ज्ञात असल्यामुळे भीतीचे कारण नसल्याचेच सांगत आहेत. दरम्यान, भारतात ४ बाळांना या विषाणूची लागण झाल्याचे सोमवारी आढळल्याने आरोग्य यंत्रणेने देशभरात सावधगिरी वाढवली आहे.

**चीनच्या वुहानमधून पसरलेल्या कोरोना विषाणूमुळे जगभरात निर्माण झालेल्या परिस्थितीतून अनेक देश व समुदाय अद्याप पुरते सावरलेले नसतानाच चीनमधील एचएमपीव्ही विषाणूच्या फैलावामुळे जगभरात भीती व आशंकेचे वातावरण निर्माण झाले आहे. एचएमपीव्ही म्हणजे ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस. भारतात सोमवारी संध्याकाळपर्यंत या विषाणूच्या चार केसेसची नोंद झाल्याचे सांगण्यात आले. चीनच्या शेजारी देशांसह भारतानेही चीनमधील परिस्थितीची माहिती वेळोवेळी देण्याची मागणी जागतिक आरोग्य संघटनेकडे केली आहे. मात्र भारतात याबाबत कोणतीही गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाही असे देशाचे आरोग्य सेवा महासंचालक डॉ. अतुल गोयल यांनी स्पष्ट केले आहे. भारतात मेटापन्यूमोव्हायरस हा एक सामान्य श्वसन व्हायरस गणला जातो. त्यामुळे सर्दी, फ्लू सारखी लक्षणे दिसू शकतात. एक वर्षापेक्षा कमी वयाची मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्ये त्याची लक्षणे थोडी गंभीर असू शकतात. रोगप्रतिकार शक्ती कमी असणाऱ्यांनीही खबरदारी घेण्याची गरज आहे. गंभीर केसेसमध्ये या विषाणूमुळे न्यूमोनियाही होऊ शकतो. परंतु मूलत: हा एक गंभीर आजार नसल्याने देशातील रुग्णालये संबंधित परिस्थितीला तोंड देण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहेत असे म्हटले जात आहे. दरम्यान, रविवारी महाराष्ट्रात या विषाणूचा एकही रुग्ण आढळलेला नसतानाही खबरदारी म्हणून एचएमपीव्हीबाबत दक्षता घेण्यासह सर्दी-खोकल्याच्या रुग्णांच्या सर्वेक्षणाचे पाऊल राज्याच्या आरोग्य विभागाने उचलले. नागरिकांनीही खबरदारीचा उपाय म्हणून श्वसनविकाराच्या संसर्गापासून आपला बचाव करण्यासाठी काळजी घ्यावी असे आरोग्य विभागाने म्हटले आहे. या विषाणूचे स्वरूप कोरोनापेक्षा वेगळे असले तरी त्याची लक्षणे मात्र कोरोनासारखीच असल्याने घेण्याच्या खबरदारीचे स्वरूपही साधारणपणे सारखेच आहे. खोकताना, शिंकताना तोंड आणि नाक रूमाल किंवा टिश्यू पेपरने झाकल्यास हा विषाणू पसरण्यास अटकाव होईल. पृष्ठभागावरील स्पर्शातूनही तो पसरू शकतो, त्यामुळे साबण, पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने हात वारंवार धुण्याची काळजी घेणे जरुरीचे आहे. ताप, खोकला आणि शिंका अशी लक्षणे दिसत असणाऱ्या व्यक्तींनी सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळल्यासही विषाणूचा फैलाव मर्यादित राहील. थंडीत सर्वसाधारणपणे दारेखिडक्या बंद ठेवली जातात. बंदिस्त जागेत कुठल्याही विषाणूचा फैलाव वेगाने होतो. त्यामुळे शक्यतो सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन ठेवण्याची गरज आहे. बाकीची काळजीही कोरोनाप्रमाणेच घेणे हितकारक ठरेल. हस्तांदोलन टाळणे, वापरलेल्या टिश्यू पेपर किंवा रूमालाचा पुन्हा पुन्हा वापर न करणे, आजारी व्यक्तींशी संपर्क टाळणे, डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श न करणे आणि सार्वजनिक ठिकाणी न थुंकणे यांसारख्या चांगल्या सवयी कायमस्वरूपीच लावून घेणे खरे तर आवश्यक आहे. अशा एखाद्या विषाणूचा फैलाव होत असल्यास ते आणखीन महत्त्वाचे ठरते. एचएमपीव्ही हा विषाणू जगभरात गेल्या अनेक वर्षांपासून दिसत आलेला असल्याने काळजीचे काहीच कारण नसल्याचे जगभरातील तज्ज्ञांनी म्हटले आहे हे लक्षात घेऊन घबराट मात्र टाळण्याची गरज आहे.**

# ‘पोपटी’तून पर्यटन आणि रोजगार!





रायगड जिल्हा निसर्ग समृद्धीने संपन्न आणि जैवविविधतेनेही नटलेला आहे. रायगडच्या निसर्ग सौंदर्याबरोबरच रायगड मध्ये बहरत असलेली पारंपारिक खाद्य संस्कृती पर्यटक आणि खवय्यांचे खास आकर्षण ठरत आहे.

कोकण किनारपट्टीच्या भागांमध्ये मिळणारी चवदार अशी मासळी, सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये मिळणाऱ्या विविध अशा नैसर्गिक रानमेव्याचे सर्वसामान्यांना आकर्षण आहे, याबरोबरच रायगडच्या शेतीतून मिळणारी विविध पिके आणि या पिकातून बहरणारी अर्थव्यवस्था ही देशाला प्रगतीपथाकडे नेणारी आहे. रायगडच्या मातीत उगवणारी विविध कडधान्य भोजनाची लज्जत वाढवतातच त्याचबरोबर पर्यटक आणि खवय्यांना प्रेमातही पाडतात. रायगडच्या मातीत रब्बी हंगामात होणारी कडधान्य शेती आणि या कडधान्य शेतीमध्ये वाळाची मोठ्या प्रमाणात लागवड ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणारी ठरत आहे. वाळाची शेती अलीकडच्या काळात शेतकऱ्यांना अर्थार्जनाचे मोठे साधन होत असून वाळाच्या शेंगांची पोपटी ग्रामीण तसेच शहरी नागरिकांच्या आकर्षणाचा विषय ठरत आहे. हिवाळा म्हणजे उबदार कपडे आणि शेकोटी त्याबरोबरीने पोपटी पार्टी असे एक समीकरण सर्वत्र रूढ होत आहे. पोपटी पार्टीच्या या प्रकाराला तरुण, तरुणी, आबालवृद्ध पर्यटकांची तसेच स्थानिकांची पसंती मिळत आहे.या पोपटी पार्टीसाठी पुणे, मुंबई यासारख्या जवळच्या शहरातून पोपटी हंगामात पर्यटक रायगडच्या ग्रामीण भागात येत असून यानिमित्ताने पोपटी पर्यटनाचा आनंद घेतला जात आहे.साधारणपणें डिसेंबर अखेर ते अगदी मार्च, एप्रिल महिन्यापर्यंत पोपटीचा हंगाम असतो.शेतातून वाळ तयार होण्याचा कालावधी ते वाल संपण्याचा कालावधी पोपटी हंगामासाठी उत्तम समजला जातो. स्थानिक वाळ शेंगा उपलब्ध नसल्या तरी घाटमाथ्यावरील पावट्याच्या शेंगा पोपटीसाठी उपयोगात आणल्या जातात. हिवाळा आणि पोपटी हे समीकरण रायगडसह संपूर्ण कोकणात प्रसिद्ध आहे. रब्बी हंगामात तालुक्यात मोठया प्रमाणात वालाची लागवड होते. अत्यंत चविष्ट असलेला हा वाल प्रसिद्ध असून या वालाच्या शेंगांना चांगली मागणी आहे.

थंडीच्या दिवसात या वालाच्या शेंगांची पोपटी लावण्याची परंपरा असून पोपटीच्या शेंगा खवय्यांच्या पसंतीस उतरतात. मातीच्या मडक्यात ठाराविक पद्धतीने या शेंगा शिजविल्या जातात. या शेंगाबरोबर अंडी, मांस, कांदे, बटाटी व आवडीनुसार इतर पदार्थ शिजविले जातात. शेतातील वालाच्या शेंगा, खादय पदार्थ व भामरूड नावाची वनस्पती घेऊन गवऱ्या, गवत पेंढा इत्यादींच्या माध्यमातून तयार झालेले मडके २० ते २५ मिनिटे चांगल्या अग्नित भाजले जाते. मडक्यात शिजलेल्या शेंगा खाण्यास चवदार लागतात. त्यामुळे पर्यटक व स्थानिक नागरिकांकडून या दिवसांत पोपटीच्या शेंगांना चांगली मागणी असते. या मागणीचा विचार करून पर्यटनातील संधी ओळखून जिल्ह्यातील काही तरूणांनी पर्यटक व स्थानिक खवय्यांना आकर्षित करण्याच्या उद्देशाने ‘पोपटी’ लावून देण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. शेतातील वालाच्या शेंगा व इतर साहित्य यातून हि पोपटी पर्यटकांसाठी व खवय्यांसाठी तयार करून दिली जाते. गेल्या वर्षी प्रायोगिक स्तरावर हा प्रयोग राबवून या वर्षी स्थानिक तरूण पर्यटकांना पोपटीच्या माध्यमातून आकर्षित करण्याच्या तयारीत आहेत.शाकाहारी व मांसाहारी अशा दोनही स्वरूपात सदरची पोपटी करून मिळणार असून शाकाहारी पोपटीत शेंगा, बटाटी, कांदे इत्यांदींचा समावेश असेल तर मांसाहारीमध्ये चिकन, अंडी, बटाटी इत्यादी पदार्थांचा समावेश असणार आहे. शाकाहारी पोपटी ७०० ते ८०० रूपयांना तर मांसाहारी पोपटीसाठी ८०० ते ९०० रूपये देवून ठरविलेल्या प्रमाणात सदरची पोपटी करून मिळणार आहे. पोपटी साठी मातीचे मडके घेतले जाते. या मडक्यामध्ये शेतात मिळणाऱ्या बांभरुड ही वनस्पती तळात गोलाकार लावली जाते. नंतर यामध्ये वालाच्या शेंगा, चवीनुसार मीठ, ओवा ,अंडी, मसाला लावलेले चिकन टाकले जाऊन मडक्याचे तोंड वाळाच्या पाल्याने किंवा बांभरुडांनी बंद केले जाते. मडक्याला शेणी , लाकूड किंवा पेंढा यामध्ये पंधरा ते वीस मिनिटे जाळ देयुन उष्णता दिली जाते. चांगली उष्णता मिळाल्यास पंधरा मिनिटांमध्ये पोपटी खाण्यास तयार होते.

हिवाळ्यात रायगड मध्ये मोठ्या प्रमाणात वाळाची शेती केली जाते. वाळाच्या शेंगा तयार झाल्यानंतर पोपटीचा हंगाम सुरू होतो. अलीकडच्या काळात मुंबई, पुण्यासारख्या शहरातून तरुणांबरोबर जेष्ठ नागरिकांना याचे आकर्षण आहे .अत्यंत चवदार अशा शेंगा व त्यामध्ये खरपूस असे भाजलेले चिकन, अंडी यांची लज्जत न्यारी असते .कोकणातील ही खाद्य परंपरा अलीकडे प्रसिद्ध होत असून त्खवय्यांची पसंती मिळत आहे. यातून स्थानिकांना चांगला रोजगार मिळत आहे. वालाच्या शेंगा व त्यातून मिळणारे उत्पादन हे स्थानिकांना रोजगाराचे एक साधन म्हणून उपलब्ध होत आहे. पर्यटनाच्या दृष्टीने यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे पोपटी आयोजक नयन पोटले यांनी सांगितले.

पोपटी पार्टी ही संकल्पना अलीकडच्या काळात रूढ होत असून एक आकर्षण व खाण्याच्या नवीन पदार्थाचा आस्वाद तसेच पोपटीच्या निमित्ताने एकत्रित येणे, गप्पांचा कार्यक्रम तसेच एकत्रित भोजनाचा कार्यक्रम या निमित्ताने होत असतो. पोपटी ही संकल्पना जुनी असली तरी पर्यटक या पोपटी पार्ट्यांसाठी रायगडमध्ये नेहमीच येतात. यातून स्थानिकांना निश्चितपणे चांगला रोजगार उपलब्ध होत आहे. या पोपटी पार्ट्यांना आधुनिक स्वरूप तसेच ग्रामीण लज्जत व ग्रामीण भागातील पर्यटन म्हणून रुजणे अधिक आवश्यक आहे. यातून ग्रामीण भागातील तरुणांना, खेड्यांना हक्काचा रोजगार उपलब्ध होईल . कोकणच्या सौंदर्याची पर्यटकांना भुरळ आहेच याबरोबरच पोपटी पर्यटनासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात रायगडमध्ये येत आहेत यातून निश्चितच स्थानिक शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध होईल, असे नवी मुंबई येथील पर्यटनप्रेमी दीपक ठाकूर यांनी सांगितले.

शेतीचे क्षेत्र घटत असताना तसेच मजुरी व इतर खर्च परवडत नसताना अनेक शेतकरी पारंपारिक पद्धतीनें शेती करत आहेत. शेतकऱ्यांनी या आधुनिक अर्थबळ देणाऱ्या संकल्पना स्वीकारल्यास तोट्यातील शेती फायद्यात येईल व आर्थिक गणित जोडले जाईल, असे पोपटी व्यावसायिक नयन पोटले यांनी सांगितले. **(शब्दांकन : सलीम शेख)**



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टवॉचमुळे सिगारेटचे व्यसन सुटते? नवे संशोधन जाणून घ्या

तुम्हाला कोणत्याही प्रकारचं व्यसन सोडायचं असेल तर तंत्रज्ञानाची मदत होऊ शकते. कारण, या डिजिटल युगात आपण इतके पुढे गेलो आहोत की तंत्रज्ञानाच्या मदतीनं काहीही अशक्य नाही. त्यात सिगारेट सोडण्यासाठी तर फक्त स्मार्टवॉच पुरे आहे. तुम्ही सिगारेट ओढणारे आहात आणि तुमच्याकडे स्मार्टवॉच असेल तर समजा तुम्ही व्यसनमुक्त झालात. सिगारेटपासून सुटका होण्यासाठी थोडीशीही मदत झाली तर ते मोठं यश ठरू शकतं. धूम्रपान सोडणे हे बऱ्याच लोकांसाठी सर्वात कठीण कामांपैकी एक आहे, पण हे व्यसन सुटू शकतं.



निकोटीनचे व्यसन एखाद्या व्यक्तीला केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्ट्या देखील प्रभावित करते. ब्रिस्टल विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी नवा आशेचा किरण दिला आहे. त्यांनी एक स्मार्टवॉच ॲप विकसित केले आहे. हे सिगारेटच्या व्यसनापासून मुक्त होण्यास मदत करते. हे ॲप स्मार्टवॉचच्या सेन्सरच्या मदतीने काम करते.

हे ॲप विशेषतः स्मार्टवॉचच्या एक्सेलेरोमीटर आणि जायरोस्कोप सेन्सरचा वापर करते. हे सिगारेट पकडण्यासारख्या हालचाली ओळखू शकते. कुणी सिगारेट पकडण्याचा प्रयत्न केला की स्मार्टवॉच लगेच अलर्ट पाठवतो. हा अलर्ट स्क्रीनवर मेसेज म्हणून दिसतो. हा मेसेज पॉझिटिव्ह तसेच उत्साहवर्धक असू शकतो. उदा. आपण आज सिगारेट ओढली नाही, आपण चांगले करत आहात! किंवा आपण धूम्रपान सोडण्याचा निर्णय का घेतला हे लक्षात ठेवा. अशा प्रकारचे अलर्ट येतात.

नुकतेच JMIR फॉर्मेटिव्ह रिसर्चमध्ये ’स्मोकिंग रिलेप्ससाठी स्मार्टवॉच-आधारित हस्तक्षेप सादर करणे आणि मूल्यांकन करणे (व्यवहार्यता आणि स्वीकार्यता अभ्यास’) हे संशोधन प्रकाशित करण्यात आले. या संशोधनांतर्गत ॲपचे तंत्रज्ञान १८ जणांच्या सवयींसाठी वापरण्यात आले. हे सर्व लोक रोज धूम्रपान करायचे आणि ते सोडण्याचा प्रयत्न करत होते. धूम्रपानापासून सुटका मिळवण्यासाठी स्मार्टवॉच रामबाण?

नुकतेच रिसर्चमध्ये ’स्मोकिंग रिलेप्ससाठी स्मार्टवॉच-आधारित हस्तक्षेप सादर करणे आणि मूल्यांकन करणे (व्यवहार्यता आणि स्वीकार्यता अभ्यास’) हे संशोधन प्रकाशित करण्यात आले.

# दीपस्तंभ पत्रकारितेचा बाळशास्त्री जांभेकर

आद्य मराठी पत्रकार, आद्य समाजसुधारक आणि आद्य प्रपाठक म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकर ओळखले जातात. भारतातील पहिले प्रोफेसर होण्याचा बहुमानही बाळशास्त्रींना मिळाला. पुढे ते शिक्षण विभागाचे संचालक झाले. त्यांनी विविध विषयांवर ग्रंथ लिहिले.



## प्रासंगिक

यात प्रामुख्याने भूगोल, इतिहास, भौतिकशास्त्र, गणित, खगोलविद्या, मानसशास्त्र आदी विषयांचा समावेश आहे. सोप्या आणि साध्या मराठी भाषेत सर्वांना समजतील, असे हे ग्रंथ आहेत. याच बरोबर त्यांनी बालव्याकरण, भूगोलविद्या, सारसंग्रह आणि नीतीकथा हे चार ग्रंथ लिहिले आहेत. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास हा ग्रंथ १८५१ यावर्षी त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झाला त्यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या इंग्रजी आणि मराठी भाषेतील पाक्षिकाची सुरूवात करून मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या या कार्यामुळे मराठीतील आद्यसंपादक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. आज या घटनेस १९३ वर्षे पूर्ण झाली.त्यांच्या कार्याची आठवण आपणास राहावी म्हणून प्रतिवर्षी ६ जानेवारी रोजी राज्यात ‘दर्पण दिन’ साजरा केला जातो.

वृत्तपत्रांचा इतिहास हा जनतेचा आणि चळवळींचा इतिहास असतो. वृत्तपत्रे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात. त्याद्वारे लोकांना सामाजिक संकेत, कार्यात्मक भूमिका आणि मूल्य याबाबतचे शिक्षण दिले जाते, आचार्य जांभेकरांनी केवळ लोककल्याण आणि लोकशिक्षण असाच उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन ’दर्पण’ प्रकाशित केले. १८३२ चा काळ, अर्थातच इंग्रजांच्या अधिपत्याचा काळ होता. राष्ट्रभक्तीसाठी समाजास प्रबोधनाची मोठी गरज होती. इंग्रजांच्या हातात आपले राष्ट्र असताना आपल्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करुन, परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी एखादे वृत्तपत्र असावे, असे बाळशास्त्रींना वाटले आणि त्यांनी दर्पण सुरु केले. ’दर्पण’मध्ये एकही जाहिरात त्यांनी छापली नाही. अगदी स्वत:चे पैसे टाकून जवळपास आठ वर्षे लोकांसाठी वृत्तपत्र सुरु ठेवले. भाऊ महाजन यांच्या सहकार्याने मराठी तर स्वत: इंग्रजी मजकूराची बाजू ते ’दर्पण’साठी सांभाळत. त्यामुळे ’दर्पण’ मधील मजकूराचा दर्जा उच्च होता.

दर्पणच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण व मनोरंजन यांचा समन्वय साधला. दर्पण हे इंग्रजी विद्येचा मराठी सार सांगणारे ठरले. २५ जून १८४० यावर्षी दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. दर्पण वृत्तपत्राची निर्मितीच नव्हे तर समाजसुधारणेचे कार्यही बाळशास्त्री जांभेकरांनी केले. किंबहुना सामाजिक सुधारणेच्या बाबतीत ते आग्रही होते. समाज सुधारला तरच राजकीय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होईल असे त्यांचे मत. सार्वजनिक जीवनात विचारमंथन करण्यासाठी वर्तमानपत्रासारखी मोठी शक्ती आहे. तिचा उपयोग समाजात बदलासाठी होऊ शकतो. याचा त्यांना अभ्यास होता. समाजसुधारणा, शिक्षण आणि वृत्तपत्र प्रसार यासाठी केलेले कार्य हे अलौकिक असे आहे. त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून मुंबईचे तत्कालीन गर्व्हनर सर जेम्स कॉर्नोक यांनी १८४० यावर्षी जस्टीस ऑफ पीस अशी पदवी देऊन बाळशास्त्रींचा गौरव केला.

**-डॉ.राजू पाटोदकर**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात खूप थंडी जाणवत असेल तर काळी वेलची चघळा

अनेकांना हिवाळ्यात खूप थंडी जाणवते. कोमट पाणी आणि चहा-कॉपी पिणे, आरामदायक हिवाळ्यातील कपडे घालणे या गोष्टी अशा वेळी फायदेशीर ठरतात. एकात्मिक पोषणतज्ज्ञ नेहा रंगलानी यांनी एक उपाय सुचविला आहे, तो अशा स्थितीत नेहमी फायदेशीर ठरतो; तो म्हणजे काळी वेलची खाणे.



काळी वेलची किंवा मोठी वेलचीमध्ये काही संयुगे असतात, जी आपल्या शरीरात उष्णता निर्माण करण्यास उत्तेजित करतात आणि आपल्याला उबदार ठेवतात. हे रक्ताभिसरण आणि रक्त प्रवाहदेखील सुधारते, जेणेकरून उष्णता समान रीतीने वितरीत केली जाईल. हे शरीरातील कफ आणि वात दोषदेखील संतुलित करते, जे हिवाळ्यात जाणवणाऱ्या थंडीशी संबंधित आहे. म्हणून घराबाहेर जाताना काळी वेलची बरोबर घेण्यास विसरू नका काळी वेलची शरीरातील फिनोलिक संयुगांनी समृद्ध असते, जी रक्ताभिसरणासाठी चांगली असते. खरंतर धुरकट आणि तिखट चव असलेली मोठी वेलची ही थर्मोजेनिक मानली जाते.

आहारतज्ज्ञ कनिका मल्होत्रा यांनी याबाबत द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना पुष्टी केली की, काळी वेलची खरोखर थर्मोजेनिक आहे, याचा अर्थ ती शरीरात उष्णता उत्पादन वाढवू शकते.याच्या परिणामाचे श्रेय वेलचीमधील बायोक्टिव्ह संयुगे, जसे की सिनेओल, टेरपिनेन आणि कापूर यांना दिले जाऊ शकते, जे चयापचय उत्तेजित करण्यासाठी आणि रक्ताभिसरण सुधारण्यासाठी ओळखले जातात. ही संयुगे थर्मोजेनेसिस वाढवू शकतात. थर्मोजेनेसिस ही एक प्रक्रिया आहे, जिथे शरीर उष्णता निर्माण करते,

काळ्या वेलचीमध्ये पोटफुगी दूर करणारे सुगंधी औषध-कार्मिनेटिव आणि पाचक गुणधर्म आहेत, जे गॅस्ट्रोइंटेस्टाइनल फंक्शन म्हणजेच जठराचे कार्य सुधारू शकतात आणि चयापचय प्रक्रिया उत्तेजित करू शकतात, जे अप्रत्यक्षपणे तापमानवाढीच्या संवेदनामध्ये योगदान देतात. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ २०१५ च्या अभ्यासानुसार, काळी वेलची मेटाबॉलिक सिंड्रोमची चिन्हे प्रभावीपणे उलट करते. काळ्या वेलचीमध्ये कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण वाढवतात आणि हा घटक गॅस्ट्रोइंटेस्टाइनल फंक्शन सुधारू शकतो, आहारातील फायबर लठ्ठपणा कमी करतो,अत्यंत थंडीचा सामना करण्यासाठी काळी वेलची चघळण्याचा परिणाम वैयक्तिक शरीरशास्त्रानुसार (प्रत्येक व्यक्तीनुसार) बदलू शकतो.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित

# जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे सर्व नागरिकांना सुचित करण्यात येत आहे की, नवी मुंबई येथे सिडको संपादित जागेवर कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी न घेता अनधिकृत बांधकामे करण्यात येत असल्याचे दिसून येते. यामध्ये मोठया प्रमाणात तात्पुरत्या व काही पक्क्या बांधकामांचा समावेश आहे. सदर अनधिकृत बांधकामे सिडको महामंडळ कायदेशीर प्रक्रिया अवलंबून निष्कासित करीत आहे. त्यामुळे नागरीकांनी नवी मुंबई येथे चालू असलेल्या इमारतीमध्ये सदनिका अथवा दुकाने खरेदी करतेवेळी सदर जागेची मालकी हक्काची कागदपत्रे तसेच संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून सदर इमारतीस बांधकाम परवानगी देण्यात आली आहे का? याची खात्री करावी अन्यथा होणाऱ्या कायदेशीर परिणामांस/आर्थिक नुकसानीस सिडको महामंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. अनधिकृत बांधकामांबद्दलचे तपशील वर्तमान पत्रातून वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

दि.०१ ऑक्टोबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत खालील यादीत नमूद अनधिकृत बांधकामांना/ बांधकामधारकांना महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम १९६६ अन्वये नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. या अनधिकृत बांधकामांची निष्कासन मोहिम हाती घेण्यात आलेली असून, अनेक प्रकरणांमध्ये नियमानुसार निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली असून, सोबत दिलेल्या तक्त्यामधील ''शेरा'' यामध्ये ''निष्कासित'' असेही नमूद केले आहे. याव्यतिरिक्त कार्यवाही प्रस्तावित असलेल्या प्रकरणांमध्ये नागरीकांनी सदर बांधकामाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे व्यवहार करु नयेत यासाठी ही सूचना देण्यात येत आहे, अन्यथा तसे केल्यास सिडको महामंडळ भविष्यात जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

### उरण व द्रोणागिरी नोडमधील अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटीसांचा तपशिल

| अ.क्र. | नोटीस क्र. | अनधिकृत बांधकामधारकाचे नांव व पत्ता | नोड/गाव | सेक्टर / सर्व्हे नंबर/ भुखंड क्र. | बांधकामाचे स्वरुप | बांधकामाचे अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) | MRTP सन १९६६ चे कलम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | U -२२२१ १५/१०/२०२४. | १.श्री. हरेश्वर(बंद कंटेनर) २.नसिम फुटवेअर | जासई | स नं. १०६/२,३ १०७/१ | कंटेनर शॉप व पत्राशेड | २०५.००चौ.मी. | ५३(१) (अ) |
| २ | U -२२२२ १५/१०/२०२४. | १.वेल्कम हॉटेल+ शिवकृपा मोबाईल. २. गॅरेज | जासई | स नं. १०७/१ | पत्राशेड | २२७.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| ३ | U -२२२३ १५/१०/२०२४. | अन्वर खान पाटेवाल-गॅरेज | जासई | स नं. १०३/१४ | कंटेनर शॉप | ३५.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| ४ | U -२२२४ १५/१०/२०२४. | M.K Tyre. service | जासई | स नं. १०३/१४ | कंटेनर शॉप | २५.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| ५ | U -२२२५ १५/१०/२०२४. | यादव टिस्टॉल हॉटेल | जासई | स नं. १०३/२० | पत्राशेड | ३८.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| ६ | U -२२२६ १५/१०/२०२४. | सोहिल शेख –पान शॉप | जासई | स नं. १०३/२० | पत्राशेड | ३०.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| ७ | U -२२२७ १५/१०/२०२४. | यादव किराणा अॅड जनरल स्टोअर | जासई | स नं. १०३/१९B,२० | कंटेनर शॉप | १८.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| ८ | U -२२२८ १५/१०/२०२४. | सलुन+S.S ऑनलाईन+ स्पेअर पार्ट शॉप | जासई | स नं. १०३/१९B, | पक्के पत्रा छत | १०७.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| ९ | U -२२२९ १५/१०/२०२४. | विकी किराना स्टोअर+ चिकन दुकान | जासई | स नं. १०३/१९B, | पत्राशेड | ४८.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| १० | U -२२३० १५/१०/२०२४. | गणेश कृपा मायरा हॉटेल | जासई | स नं. १०३/१९A/१, १०३/१९A/२, १०३/१९B | पत्राशेड | ३८.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| ११ | U -२२३१ १५/१०/२०२४. | पंचर दुकान+सलुन | जासई | स नं. १०१/१ | पत्राशेड | ३५.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| १२ | U -२२३२ १५/१०/२०२४. | १.स्वागत ढाबा २.पंचरवाला-मोहमद अरमान | जासई | स नं. १०३/६A, १००/८ | पत्राशेड | १००.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| १३ | U -२२३३ १५/१०/२०२४. | वॉशिंग सेंटर-मुन्ना | जासई | स नं. १००/७ | पत्राशेड | १३.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| १४ | U -२२३ १५/१०/२०२४. | संजय मोटर्स | जासई | स नं. १००/६ | कंटेनर शॉप | २०.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| १५ | U -२२३५ १५/१०/२०२४. | हॉटेल पार्किंग सहारा | जासई | स नं. १००/६ | पत्राशेड | १३२.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| १६ | U -२२३६ १५/१०/२०२४. | मनोज का ढाबा+पानटपरी+पंचर दुकान | जासई | स नं. १००/२ | पत्राशेड | ६०.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| १७ | U -२२३७ १३/११/२०२४. | अध्यक्ष/सचिव सिद्धीविनायक पार्क सोसायटी (wing A+B) | केगाव - उरण | स नं-११७/५, ११७/६ | पार्किंग+३ मजले | A=१६१.०० चौ.मी. B=१६१.०० चौ.मी. | ५३(१) (अ) |
| १८ | U -२२३८ २१/१२/२०२४. | अनिल अॅटो पार्ट+मेहबुब आलम पंचर दुकान/अनधिकृत बांधकामधारक | जासई | स नं-१२५/६ | कंटेनर शॉप+पत्राशेड | २०.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| १९ | U -२२३९ २१/१२/२०२४. | सुपर किंग हॉटेल/अनधिकृत बांधकामधारक | जासई | स नं-१२५/४ | पत्राशेड | ५०.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| २० | U -२२४० २१/१२/२०२४. | SHAURY Mobile L.D+ माताजी जनरल स्टोअर/अनधिकृत बांधकामधारक | जासई | स नं-१२५/४ | कंटेनर शॉप | २१.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| २१ | U -२२४१ २१/१२/२०२४. | इस्माईल शहा भंगार दुकान/अनधिकृत बांधकामधारक | जासई | स नं-१२८/१ | पत्राशेड | ६४.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| २२ | U -२२४२ २१/१२/२०२४. | हॉटेल KGN राशी/अनधिकृत बांधकामधारक | जासई | स नं-१२८/२ | पत्राशेड | ७०.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| २३ | U -२२४३ २१/१२/२०२४. | तारीफ रझा पंचर दुकान/अनधिकृत बांधकामधारक | जासई | स नं-१२८/२,८ | कंटेनर शॉप | २०.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| २४ | U -२२४४ २१/१२/२०२४. | नामदेव लक्ष्मण सिंह-हॉटेल/अनधिकृत बांधकामधारक | जासई | स नं-१२७/३A/१ | पत्राशेड | ३०.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| २५ | U -२२४५ २१/१२/२०२४. | अनिस खान+फिरोज अन्सारी/अनधिकृत बांधकामधारक | जासई | स नं-११७/१A | पत्राशेड+मोकळी जागा | २०००.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| २६ | U -२२४६ २१/१२/२०२४. | न्यु रायगड ढाबा-बंद हॉटेल/अनधिकृत बांधकामधारक | जासई | स नं-११७/२A/२ | पत्राशेड | ३५.०० चौ.मी | ५३(१) (अ) |
| | | **कामोठे नोडमधील अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटिसांचा तपशील** | | | | | |
| १ | P-१२३९१ ०४/१०/२०२४. | अनधिकृत बांधकामधारक | कामोठे | से-४ | विट बांधकाम | १२०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| | | **पनवेल नोडमधील अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटिसांचा तपशील** | | | | | |
| १ | P-१२४५५ १०/१२/२०२४. | श्री. म्हात्रे/अनधिकृत बांधकामधारक | पनवेल | से.१२, भु क्र, ०२ | विट बांधकाम सिमेंट पत्राशेड ची ४ बांधकामे | १००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| २ | P-१२४५६ ११/१२/२०२४. | रेहन बी शेख/अनधिकृत बांधकामधारक | पनवेल | से.२०ई, स नं.३०२(P), ३३९(P), ३४०,(P), ३००(P) | -- | -- | ५३(१)(अ) |
| ३ | P-१२४५७ ११/१२/२०२४. | श्री. दिपक घोडेकर/अनधिकृत बांधकामधारक | पनवेल | से.२०ई, स नं.३०२(P), ३३९(P), ३४०,(P), ३००(P) | -- | -- | ५३(१)(अ) |
| ४ | P-१२४५८ ११/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | पनवेल | से.२०ई | -- | -- | ५३(१)(अ) |
| ५ | P-१२४५९ ११/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | पनवेल | से.२०ई | -- | -- | ५३(१)(अ) |
| | | **पुष्पक नोडमधील अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटिसांचा तपशील** | | | | | |
| १ | P-१२३९० ०१/१०/२०२४. | श्री. दिनेश आत्माराम उलवेकर व इतर | पुष्पक - उलवे | से-२५, भु क्र. २७४ | पक्के RCC G+१ बांधकाम | २४४.०० चौ.मी | ५३(१अ) |
| २ | P-१२४१७ १५/१०/२०२४. | १.मोहमद फारूक शहा-जनरल स्टोअर+पानटपरी २.मोहमद अरमान-पंचर दुकान ३.सोनु-मोनु सलुन शॉप ४. ब्रिजलाल यादव-भंगार दुकान | पुष्पक | स नं-४२६/३ वहाळ | पत्राशेड | ५९.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ३ | P-१२४१८ १५/१०/२०२४. | अरमान किराना स्टोअर+KGN बॅटरी | पुष्पक | स नं-४२६/३ वहाळ | पत्राशेड | ५३.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ४ | P-१२४१९ १५/१०/२०२४. | मनोज ऑटो मोबाईल | पुष्पक | स नं-४२६/३ वहाळ | पत्राशेड | २६.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ५ | P-१२४२० १५/१०/२०२४. | श्री गजानन मोबाईल शॉप/पत्राशेड हॉटेल-अफसाद अहमद | पुष्पक | स नं-४२५/१ वहाळ | कंटेनर शॉप + पत्राशेड | ५०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ६ | P-१२४२१ १५/१०/२०२४. | न्यु यादव हॉटेल | पुष्पक | स नं-४२५/४ वहाळ | पत्राशेड | ६६.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ७ | P-१२४२२ १५/१०/२०२४. | असफाक शेख-भंगार दुकान | पुष्पक | स नं-४२५/४ वहाळ | पत्राशेड | ४०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ८ | P-१२४२३ १५/१०/२०२४. | मोहमद मुक्तार-KGN ढाबा | पुष्पक | स नं-४२५/१,४ वहाळ | पत्राशेड | १००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ९ | P-१२४२४ १५/१०/२०२४. | १.अनिल मोबाईल पॉईन २. हॉटेल ३.जनरल स्टोअर ४. चिकन दुकान | पुष्पक | स नं-४२३/० वहाळ | कंटेनर शॉप + पत्राशेड | १००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |

| अ.क्र. | नोटीस क्र. | अनधिकृत बांधकामधारकाचे नांव व पत्ता | नोड/गाव | सेक्टर / सर्व्हे नंबर/ भुखंड क्र. | बांधकामाचे स्वरुप | बांधकामाचे अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) | MRTP सन १९६६ चे कलम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | P-१२४२५ १५/१०/२०२४. | सय्यद अली-भंगार दुकान | पुष्पक-दापोली- | स नं-४२०/४ वहाळ | पत्राशेड | ४०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ११ | P-१२४३० २२/१०/२०२४. | श्री.अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | पनवेल-दापोली- | से-१५ भु क्र.४७ ते ५१ | मंदिराचे विट बांधकाम | २०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १२ | P-१२४३१ २५/१०/२०२४. | सत्यम ग्रुप कंटेनर कार्यालय | पनवेल-दापोली-१६(पुष्पक) | भुखंड क्र. ४, सेक्टर ५ | कंटेनर कार्यालय | १५०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १३ | P-१२४३२ २५/१०/२०२४. | विनायक आंगण बिल्डींग कंटेनर कार्यालय | पनवेल-दापोली-१६(पुष्पक) | भुखंड क्र. ३, सेक्टर ५ | कंटेनर कार्यालय | १५०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १४ | P-१२४३३ २५/१०/२०२४. | दिपक लॉजिस्टिक | पनवेल-दापोली- | ०४,१०३ व १०२/१ | लॉजिस्टिक व गॅरेज | १२००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १५ | P-१२४३४ २५/१०/२०२४. | स्कायटच बिल्डींग | पनवेल-वडघर | १३८ | अशोक गट व अलका गट गाळा नं.-२ | ६०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १६ | P-१२४५१ ०९/१२/२०२४. | श्री. अमोल नंदकुमार लाड व इतर०१/अनधिकृत बांधकामधारक | पुष्पक-वहाळ | से-२५, भु क्र. ३२१ | पक्के RCC G+४ व ४ दुकाने | -- | ५३(१)(अ) |
| १७ | P-१२४६० १७/१२/२०२४. | ज्ञानेश्वर जगन्नाथ तांडेल व इतर पारगांव पनवेल | पारगाव | १/२ | वीट बांधकाम | ६४.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १८ | P-१२४६१ १७/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | पारगाव | १/२ | बांबु पत्राशेड | ५०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १९ | P-१२४६२ १७/१२/२०२४. | श्री. राजेश म्हात्रे/अतिक्रमणधारक | पारगाव | २७/२ | पक्के वीट बांधकाम | १००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| | | **खारघर नोडमधील अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटिसांचा तपशील** | | | | | |
| १ | P-१२४०१ १४/१०/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी | भुखंडा भोवती पत्र्याचे कुंपण | ४००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| २ | P-१२४०२ १४/१०/२०२४. | श्री प्रकाश वाघे/अतिक्रमणधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | १ रूम चे विट बांधकाम रहाते घर | ४०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ३ | P-१२४०३ १४/१०/२०२४. | श्री. बाबूराव लक्ष्मण वाघे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | १ रूम चे विट बांधकाम रहाते घर | ४०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ४ | P-१२४०४ १४/१०/२०२४. | श्री. बाळाराम बुधाजी वाघे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | ४ रूम चे विट बांधकाम रहाते घर | ११० X ०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ५ | P-१२४०५ १४/१०/२०२४. | श्री. प्रकाश किसन वाघे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | विटांचे पक्के बांधकाम | ८०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ६ | P-१२४०६ १४/१०/२०२४. | श्रीमती. इमलाबाई किसन वाघे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | ६ रूम चे विट बांधकाम रहाते घर | १७०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ७ | P-१२४०७ १४/१०/२०२४. | टॉयलेट वॉशरूम-पनवेल मनपा | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | सिमेंट व्लॉलचे टायलेट | ०५ X ०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ८ | P-१२४०८ १४/१०/२०२४. | श्री. गजानन कृष्णा घरत | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | २ रूम चे विट बांधकाम रहाते घर | ७०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ९ | P-१२४०९ १४/१०/२०२४. | श्री. सुरेश कातकरी व अभिमन्यु वाघे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | ३ रूम चे विट बांधकाम रहाते घर | २१०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १० | P-१२४१० १४/१०/२०२४. | श्री. रामदास लक्ष्मण वाघमारे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | ४ रूम चे विट बांधकाम रहाते घर | ८०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ११ | P-१२४११ १४/१०/२०२४. | श्री. उदय रामदास वाघमारे व सागर रामदास वाघमारे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | २ रूम चे विट बांधकाम रहाते घर | ७०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १२ | P-१२४१२ १४/१०/२०२४. | अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | १ रूम चे विट बांधकाम रहाते घर | १००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १३ | P-१२४१३ १४/१०/२०२४. | श्री. मारूती लक्ष्मण वाघमारे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | २ रूम चे विट बांधकाम रहाते घर | ६५.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १४ | P-१२४१४ १४/१०/२०२४. | श्री. चंद्रकांत लक्ष्मण वाघमारे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | १ रूम चे विट बांधकाम रहाते घर | ६५.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १५ | P-१२४१५ १४/१०/२०२४. | श्री. किसन बाळाराम वाघे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | ५ रूम चे विट बांधकाम रहाते घर | १५०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १६ | P-१२४१६ १४/१०/२०२४. | श्री.गणपत बाळाराम वाघे | खुटुकबंधन-खारघर | से-३७ भु क्र.NA६ | ३ रूम चे विट बांधकाम रहाते घर | १००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १७ | P-१२४२६ १७/१०/२०२४. | सलीम एंटरप्रायजेस/अतिक्रमणधारक | ओवेगाव/ खारघर | स नं.३५८ | पत्राशेड व विटबांधकामा ऑफिस | ४००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १८ | P-१२४२७ १७/१०/२०२४. | निलेश एंटरप्रायजेस/अतिक्रमणधारक | ओवेगाव/ खारघर | स नं.३५८ | विटबांधकाम केलेले ऑफिस | १५०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| १९ | P-१२४३५ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २० | P-१२४३६ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २१ | P-१२४३७ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २२ | P-१२४३८ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २३ | P-१२४३९ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २४ | P-१२४४० ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २५ | P-१२४४१ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २६ | P-१२४४२ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २७ | P-१२४४३ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २८ | P-१२४४४ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| २९ | P-१२४४५ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| ३० | P-१२४४६ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| ३१ | P-१२४४७ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| ३२ | P-१२४४८ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| ३३ | P-१२४४९ ०७/११/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | खुटुकबंधन-खारघर | से-३५डी, भु. क्र. ४६,४७,४८. | बांबू ताडपत्रीची झोपडी | -- | ५३(१)(अ) |
| ३४ | P-१२४६३ ३०/१२/२०२४. | श्री. रविंद्र दोषी/अनधिकृत बांधकामधारक | खारघर | से-३३ भु क्र.११, १२ | विट बांधकाम चालू १० फुट उंची चे चालू बांधकाम | ७००.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| | | **कळंबोली नोडमधील अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटिसांचा तपशील** | | | | | |
| १ | P-१२३९२ ०७/१०/२०२४. | अतिक्रमण धारक/ भारत ऑटो गॅरेज | कळंबोली | से- १ई | बांबू ताडपत्री शेड | ०९ X ९ चौ.मी | ५३(१)(अ) |
| २ | P-१२३९३ ०७/१०/२०२४. | विजय करण/ अतिक्रमणधारक | कळंबोली | से- १ई | पानटपरी | ४ X ४ चौ.मी | ५३(१)(अ) |
| ३ | P-१२३९४ ०७/१०/२०२४. | हॉटेल विठ्ठमाऊली | कळंबोली | से- १ई | ताडपत्री शेड | ४ X १४ चौ.मी | ५३(१)(अ) |
| ४ | P-१२३९५ ०७/१०/२०२४. | महाराष्ट्र चायनिज कॉर्नर | कळंबोली | से- १ई | बांबू चटई ताडपत्री शेड | ५ X १४ चौ.मी | ५३(१)(अ) |
| ५ | P-१२३९६ ०७/१०/२०२४. | साई कृपा स्नॅक्स कॉर्नर | कळंबोली | से- १ई | लोखंडी टपरी | ४ X ४ चौ.मी | ५३(१)(अ) |

**मुख्य नियंत्रक अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३८३/२०२४–२५

(पान ६ वर..)

(पान ५ वरुन..)

सिडको
शहरांचे शिल्पकार

| अ.क्र. | नोटीस क्र. | अनधिकृत बांधकामधारकाचे नांव व पत्ता | नोड/गाव | सेक्टर / सर्व्हे नंबर/ भुखंड क्र. | बांधकामाचे स्वरुप | बांधकामाचे अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) | MRTP सन १९६६ चे कलम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | P-१२३९७ ०७/१०/२०२४. | क्वॉलटी चायनिज कॉर्नर | कळंबोली | से- १ई | बांबू चटई ताडपत्री शेड | ४ X १४ चौ.मी | ५३(१)(अ) |
| ७ | P-१२३९८ ०७/१०/२०२४. | श्री. समर्थ वडापाव सेंटर | कळंबोली | से- १ई | वडापाव लोखंडी टपरी | ४ X ४ चौ.मी | ५३(१)(अ) |
| ८ | P-१२३९९ ०७/१०/२०२४. | एकविराआई ए-१ फेमस चायनिज | कळंबोली | से- १ई | ताडपत्री शेड | ७ X १४ चौ.मी | ५३(१)(अ) |
| ९ | P-१२४०० ०७/१०/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | कळंबोली | से- १ई | बांबू ताडपत्री झोपडी | ८ X ८ चौ.मी | ५३(१)(अ) |
| | | **उलवे नोडमधील अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटीसांचा तपशिल** | | | | | |
| १ | P-१२४२८ १८/१०/२०२४. | श्री. (प्रतिक) भरत चांगू ठाकूर | उलवे | से-१०बी भु क्र. NA९ | पक्के स्वरूपाचे विटकामाचे RCC चे तळमजला ते ३ मजली बांधकाम | ४७६.०० चौ.मी १३६६.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| २ | P-१२४२९ १८/१०/२०२४. | श्री.अज्ञामधारक/अनधिकृत बांधकामधारक/विकासक | उलवे | से-१८ भु क्र.३७ -गव्हाण | विट बांधकाम | २३८०.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ३ | P-१२४५० ०४/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | उलवे | सेक्टर २१, भुखंड क्र. ३(SF) | तात्पुरते + कायमरस्वरूप कंटेनर+ विटकामाचे प्लिंथ बांधकाम | -- | ५३(१)(अ) |
| ४ | P-१२४५२ ०९/१२/२०२४. | श्री. रविंद्र केशव घरत/अनधिकृत बांधकामधारक | उलवे | से.१६, भु क्र, C१३ | RCC (G+३) चे चालू बांधकाम | ६९२.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ५ | P-१२४५३ ०९/१२/२०२४. | श्री. गुलाब घरत/अनधिकृत बांधकामधारक | उलवे | से-१६ स न.२२४/४ | RCC (G+२) चे चालू बांधकाम | १६५.०० चौ.मी | ५३(१)(अ) |
| ६ | P-१२४५४ ०९/१२/२०२४. | श्री. अजित म्हात्रे/अनधिकृत बांधकामधारक | उलवे | से.१६, भु क्र, C१४ | M.S FREAME तळमजला चे बांधकाम | १५५.०० चौ.मी | ५३(१)(अ) |

| अ.क्र. | नोटीस क्र. | अनधिकृत बांधकामधारकाचे नांव व पत्ता | नोड/गाव | सेक्टर / सर्व्हे नंबर/ भुखंड क्र. | बांधकामाचे स्वरुप | बांधकामाचे अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) | MRTP सन १९६६ चे कलम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **ऐरोली नोडमधील अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटिसांचा तपशील** | | | | | |
| १ | T- ८६७२ ०३/१०/२०२४. | सौ. शोभना रघुनाथ गायकवाड /अनधिकृत बांधकामधारक | ऐरोली | स नं१६, से-१६ | RCC (Plinth) चे चालू बांधकाम | ५४.०० चौ.मी | ५४(१) |
| २ | T- ८७१९ १६/१०/२०२४. | श्री. जितु नाईक/अनधिकृत बांधकामधारक | ऐरोली-दिवे | से-०९, स नं.८२,८३ | RCC (G+६) चे चालू बांधकाम | ४३२.०० चौ. मी | ५४(१) |
| ३ | T- ८७२४ १६/१०/२०२४. | श्री. नारायण लक्ष्मण चौगुले/अनधिकृत बांधकामधारक | ऐरोली | से-०१, स नं.१६,२१ | RCC (G+५) चे पूर्ण बांधकाम | १७४.७२ चौ. मी | ५४(१) |
| ४ | T- ८७२७ २३/१०/२०२४. | श्री. रमेश नारायण मढवी/अनधिकृत बांधकामधारक | ऐरोली | सर्व्हे नं. ०७ सेक्टर २० | RCC तळमजल्याचे चालू बांधकाम | १३६.८५ चौ. मी | ५४(१) |
| ५ | T- ८७६६ ०६/११/२०२४. | श्री.विनोद कांबळे, श्री. अशोक उके/अनधिकृत बांधकामधारक | ऐरोली | से-०१, स नं-२१०,२११ | RCC (G+४) चे चालू बांधकाम | १४३.०० चौ. मी. | ५४(१) |
| ६ | T- ८७८५ ०३/१२/२०२४. | श्रीमती. विमल जैन/ अनधिकृत बांधकामधारक/ अतिक्रमण धारक | ऐरोली | से-०१, स नं.२१०, २११ | RCC (G+६) चे चालू बांधकाम | १६७.४० चौ. मी | ५४(१) |
| ७ | T- ८७८९ १४/१२/२०२४. | श्री. अनधिकृत बांधकामधारक | दिवे | से-१०ए, स नं.६८, ६१ | लाकडी बांबू पत्रा शेड | २८०.०० चौ. मी | ५३(१)(अ) |
| ८ | T- ८७९० १४/१२/२०२४. | श्री. शरद सवादांडे/अनधिकृत बांधकामधारक | दिवे | से-१०ए, स नं.६९,३०८ | लोखंडी पत्रांचे कपाऊंड व कंटेनर | ३००.०० चौ. मी | ५३(१)(अ) |
| ९ | T- ८७९१ १४/१२/२०२४. | श्री. अनधिकृत बांधकामधारक | दिवे | से-१०ए, स नं.६८, ६१ | लोखंडी पत्रा शेड-गॅरेज | ४८.०० चौ. मी | ५३(१)(अ) |
| १० | T- ८७९२ १४/१२/२०२४. | श्री. चंदन मढवी/अनधिकृत बांधकामधारक | दिवे | से-१०ए, स नं.६८ | लाकडी बांबू पत्रा शेड | ३००.०० चौ. मी | ५३(१)(अ) |
| ११ | T- ८७९३ १४/१२/२०२४. | श्री. शरद सवादांडे/अनधिकृत बांधकामधारक | दिवे | से-१०ए, स नं.६८, ६१ | लोखंडी पत्रांचे कपाऊंड, कंटेनर, पक्के विटांचे ५ रूम | २४०.०० चौ. मी | ५३(१)(अ) |
| १२ | T- ८७९६ २०/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | दिघा (ईश्वरनगर) | सर्व्हे नं. गट नं. ४२,४५,४६ | कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या | १०.००चौ.मी. | ५४(१) |
| १३ | T- ८७९७ २०/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | दिघा (ईश्वरनगर) | सर्व्हे नं. गट नं. ४२,४५,४६ | कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या | १०.००चौ.मी. | ५४(१) |
| १४ | T- ८७९८ २०/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | दिघा (ईश्वरनगर) | सर्व्हे नं. गट नं. ४२,४५,४६ | कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या | १०.००चौ.मी. | ५४(१) |
| १५ | T- ८७९९ २०/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | दिघा (ईश्वरनगर) | सर्व्हे नं. गट नं. ४२,४५,४६ | कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या | १०.००चौ.मी. | ५४(१) |
| १६ | T- ८८०० २०/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | दिघा (ईश्वरनगर) | सर्व्हे नं. गट नं. ४२,४५,४६ | कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या | १०.००चौ.मी. | ५४(१) |
| १७ | T- ८८०१ २०/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | दिघा (ईश्वरनगर) | सर्व्हे नं. गट नं. ४२,४५,४६ | कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या | १०.००चौ.मी. | ५४(१) |
| १८ | T- ८८०२ २०/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | दिघा (ईश्वरनगर) | सर्व्हे नं. गट नं. ४२,४५,४६ | कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या | १०.००चौ.मी. | ५४(१) |
| १९ | T- ८८०३ २०/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | दिघा (ईश्वरनगर) | सर्व्हे नं. गट नं. ४२,४५,४६ | कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या | १०.००चौ.मी. | ५४(१) |
| २० | T- ८८०४ २०/१२/२०२४. | अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारक | दिघा (ईश्वरनगर) | सर्व्हे नं. गट नं. ४२,४५,४६ | कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या | १०.००चौ.मी. | ५४(१) |
